शनिवार, २५ जून २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक ३३८
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

# भूमिपुत्रांचा पुन्हा एल्गार





# नवी मुंबई विमानतळाला ‘दिबां’चे नाव लागल्याशिवाय विमान उडू देणार नाही!

(छाया : लक्ष्मण ठाकूर) अधिक छायाचित्रे पान ८ वर..

## सिडको घेराव आंदोलनातून इशारा

पनवेल : हरेश साठे


**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांचे नाव लागल्याशिवाय एकही विमान उडू देणार नाही, असा इशारा सिडको व राज्य सरकारला देत शुक्रवारी (दि. २४) सीबीडी बेलापूर येथे सिडको घेराव आंदोलनाद्वारे पुन्हा एकदा एल्गार करण्यात आला. या वेळी लोकप्रतिनिधी, भूमिपुत्रांचा जनसागर उसळला होता.** (पान २ वर..)



### ‘दिबां’चे नाव हा भूमिपुत्रांचा अट्टाहास –आमदार गणेश नाईक



लोकांच्या घरांची, नोकरीची कामे सरकारने केली पाहिजेत. झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांनाही मालकी हक्काची घरे मिळायला हवी. ज्या लोकांनी गरजेपोटी दुकाने किंवा घरे बांधली असतील ती अधिकृत करून दिली पाहिजेत. यासाठी धर्म, जात, पंथ या पलीकडे जाऊन लढा सुरू झाला आहे आणि तो यशस्वी होणार याची खात्री आहे. विमानतळाला ‘दिबां’चे नाव ही केवळ मागणी नसून भूमिपुत्रांचा अट्टाहास आहे, असे माजी मंत्री तथा विद्यमान आमदार गणेश नाईक म्हणाले.



**“ प्रकल्पग्रस्तांना भाडेपट्ट्यावर ठेवण्याचा कुटील डाव सिडकोने आखला आहे. तो या लढ्यातून हाणून पाडायचा आहे. ‘दिबा’साहेबांचे नाव विमानतळाला लागल्याशिवाय स्वस्थ बसायचे नाही.**
**–मंदा म्हात्रे, आमदार**

### भूगोल बदलेल, पण इतिहास बदलणार नाही –दशरथ पाटील

साडेबारा टक्क्यांचा कायदा ‘दिबा’साहेबांमुळे अस्तित्वात आला. त्यांनी सर्व समाजासाठी आपले आयुष्य अर्पण केले. भूमिपुत्रांचे दैवत ‘दिबां’मुळे आपण सर्व भूमिपुत्र एकसंघ झालो आहोत. त्यांनी आपल्या कार्यातून इतिहास घडविला आहे. त्यामुळे भूगोल बदलेल, पण इतिहास बदलणार नाही. इतिहास घडविणाऱ्या ‘दिबा’साहेबांचे नाव विमानतळाला लागेपर्यंत आणि भूमिपुत्रांचे सर्व मागण्या पूर्ण होईपर्यंत ही लढाई कायम राहणार असल्याचे या वेळी लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील यांनी जाहीर केले.

### आता लढाई आरपारची करायची –लोकनेते रामशेठ ठाकूर



लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीचे उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, ‘दिबा’साहेबांचे नाव विमानतळाला लागले पाहिजे आणि प्रकल्पग्रस्तांच्या नोकरी, रोजगार, गावठाण विस्तार व इतर मागण्या पूर्ण होण्यासाठी लढाई उभारली आहे. गेल्या वर्षी याच दिवशी विमानतळाला ‘दिबां’च्या नावासाठी सिडकोला घेराव घातला होता, तर मधल्या कालावधीमध्येसुद्धा प्रकल्पग्रस्त आणि स्थानिकांचे विविध प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी कृती समिती संघर्ष करीत राहिलेली आहे. जोपर्यंत विमानतळाला ‘दिबा’साहेबांचे नाव दिले जात नाही आणि प्रकल्पग्रस्तांचे प्रलंबित प्रश्न सुटत नाही तोपर्यंत संघर्ष अटळ आहे. आता लढाई आरपारची करायची आहे. प्रकल्पग्रस्तांच्या सर्व मागण्या मार्गी लागल्याशिवाय कृती समिती स्वस्थ बसणार नाही. सिडको एमडी आज आजारी आहेत, असा निरोप आला, पण ते खरोखरच आजारी आहेत की, आंदोलनाच्या धास्तीने आजारी पडले आहेत याची कल्पना नाही, परंतु ते अजून किती दिवस आजारी राहतील? आम्ही मात्र ‘दिबां’च्या नावासाठी आग्रही राहणार आहोत.

# तुमच्या धमक्यांना भीक घालत नाही!

## एकनाथ शिंदेंचे उद्धव ठाकरेंना प्रत्युत्तर

**मुंबई : प्रतिनिधी**

मंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह १२ बंडखोर आमदारांवर कारवाई करण्याची मागणी शिवसेना गटनेते अजय चौधरी यांनी विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांच्याकडे केली. यानंतर शिंदे यांनी शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरेंना प्रत्युत्तर दिले आहे.

शिवसेनेच्या वतीने विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांच्याकडे १२ बंडखोर आमदारांचे सदस्यत्त्व रद्द करण्यासाठी याचिका सादर केली आहे. शिवसेनेच्या महत्त्वाच्या बैठकांना गैरहजर राहिल्याप्रकरणी त्यांच्यावर



कारवाई करावी, अशी मागणी नवनियुक्त गटनेते अजय चौधरी यांनी झिरवळ यांच्याकडे केली आहे. शिवसेनेच्या या खेळीला एकनाथ शिंदे यांनीही प्रत्युत्तर दिले आहे.

‘कोणाला घाबरवण्याचा प्रयत्न करताय? तुमची बनवाबनवी आणि कायदा आम्हालाही कळतो! घटनेच्या १०व्या परिशिष्टाप्रमाणे (शेड्युल) व्हीप हा विधानसभा कामकाजासाठी लागतो, बैठकीसाठी नाही. या संदर्भात सुप्रीम कोर्टाचे असंख्य निकाल आहेत. आमदारांविरोधात कारवाईसाठी अर्ज करून तुम्ही आम्हाला अजिबात घाबरवू शकत नाही, कारण आम्हीच वंदनीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची खरी शिवसेना व शिवसैनिक आहोत. कायदाही जाणतो, त्यामुळे असल्या धमक्यांना भीक घालत नाही. तुम्ही संख्या नसताना अवैध गट तयार केला म्हणून तुमच्यावरच कारवाईची आमची मागणी आहे, असे शिंदे यांनी म्हटले आहे.

## आणखी एक आमदार गुवाहाटीत दाखल



**गुवाहाटी** : मुख्यमंत्री तथा शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आवाहन करूनही शिवसेना नेते व मंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटात सहभागी होणाऱ्या आमदारांची संख्या वाढतच चालली आहे. मुंबईतील चांदिवली विधानसभा मतदारसंघाचे आमदार दिलीप लांडे शुक्रवारी (दि. २४) सकाळी गुवाहाटीतील हॉटेल रेडिसन्स ब्लू येथे दाखल झाले.

महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकांच्या निकालानंतर राज्यात राजकीय भूकंप घडल्याचे दिसून आले. मंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत शिवसेनेचे बहुतांश आमदार फुटल्याने पक्षाला धक्का बसला आहे. त्यामुळे शिवसेनेने कारवाई सुरू केली असताना दुसरीकडे या कारवाईला न जुमानता आमदार शिंदेच्या गटात दाखल होण्याचे सत्र सुरूच आहे.

आमदार दिलीप लांडे शुक्रवारी सकाळी गुवाहाटीत दाखल झाले. हॉटेल रेडिसन्स ब्लूमध्ये प्रवेश करताना त्यांच्या चेहऱ्यावर मोठा आनंद दिसून आला. हात उंचावत त्यांनी हॉटेलमध्ये प्रवेश केला. त्यानंतर तिथे उपस्थित शिवसेनेच्या आमदारांची गळाभेट घेतली, हस्तांदोलन केले आणि फोटोसेशनही केले.

## राज्यसेवा परीक्षा, अभ्यासक्रमात बदल

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) घेतल्या जाणाऱ्या राज्यसेवा परीक्षेच्या परीक्षा पद्धत आणि अभ्यासक्रमामध्ये महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला आहे. वर्णनात्मक स्वरुपाच्या प्रश्नपत्रिका, मुलाखत आणि लेखी परीक्षा मिळून गुण असे सुधारित योजनेचे स्वरुप आहे. या बदलाची अंमलबजावणी राज्यसेवा परीक्षा २०२३पासून केली जाणार आहे.

एमपीएससीने समितीच्या कार्यकक्षेमध्ये राज्यसेवेची परीक्षा योजना आणि अभ्यासक्रम सुधारित करण्याचाही समावेश होता. या संदर्भातील समितीच्या शिफारसीही एमपीएससीने स्वीकारल्या आहेत.

### राष्ट्रपती निवडणूक

## एनडीएच्या उमेदवार द्रौपदी मुर्मू यांचा अर्ज दाखल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या (एनडीए) राष्ट्रपतिपदाच्या उमेदवार द्रौपदी मुर्मू यांनी शुक्रवारी (दि. २४) संसद भवनात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला.

अर्ज दाखल करताना गृहमंत्री अमित शाह, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांच्यासह अनेक राज्यांचे मुख्यमंत्री आणि एनडीएचे बडे नेते उपस्थित होते.

द्रौपदी मुर्मू यांच्या नामांकनात भाजपशासित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनीही सहभाग घेतला.



या वेळी एनडीएची एकजूट पाहायला मिळाली. जेडीयू व बीजेडीचे नेते उपस्थित होते. मुर्मू या आदिवासी समाजातून आलेल्या पहिल्या महिला नेत्या आहेत, ज्या भारताच्या सर्वोच्चपदाची निवडणूक लढवत आहेत. राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीसाठी १८ जुलै रोजी मतदान होणार आहे.

# निधीच्या गैरवापरात तातडीने हस्तक्षेप करावा

## ■ विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांचे राज्यपालांना पत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

महाविकास आघाडी सरकारमधील नगरविकास मंत्री तथा शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे यांनी बंडाचा झेंडा फडकावल्यानंतर राज्यातील कोसळणार असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे आघाडी सरकारने गेल्या दोन दिवसांत तब्बल १०६ जीआर काढले आहेत. आमदारांना ३१९ कोटींचा निधी वितरीत करण्यात आला आहे. यावर भाजप नेते तथा विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांनी आक्षेप घेतला असून राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी हस्तक्षेप करावा, अशी मागणी करणारे पत्र त्यांना पाठविले आहे.

राज्यातील राजकीय स्थिती गेल्या तीन दिवसांत अत्यंत अस्थिरतेची बनली आहे. शिवसेना पक्षात मोठ्या प्रमाणात बंडाळी झाल्याने स्वतः राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राजीनामा देण्याची मनीषा जाहीर केली आहे.

मुख्यमंत्र्यांचे शासकीय निवासस्थानसुद्धा त्यांनी रिक्त केल्याचे माध्यमांमधून कळले आहे. अशात राज्य सरकारतर्फे अंधाधुंद पद्धतीने शासकीय आदेश (जीआर) काढून निर्णयांचा सपाटा राबविला जात आहे.



कधी नव्हे ते इतक्या महाविकास आघाडीचे सरकार निर्णय घ्यायला लागले आहे. याबाबत माध्यमांमध्ये यासंदर्भातील विस्तृत वृत्तसुद्धा प्रकाशित झाले आहे. १६०च्या वर शासन आदेश ४८ तासांत जारी करण्यात आले आहेत. विकास प्रकल्पांच्या नावाखाली होत असलेला हा प्रकार संशय वाढविणारा आहे, असे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांनी पत्रात म्हटले आहे.

**निधीवाटपाबाबतचे निर्णय संशयास्पद**

अडीच वर्षे निर्णयशून्य असलेले महाविकास सरकार कोट्यवधी रुपयांना मान्यता देत आहे. त्यामुळे या गंभीर आणि संशयास्पद परिस्थितीत आपण तातडीने लक्ष घालावे, अशी स्थिती आहे. पोलीस दल आणि अन्य महत्त्वाच्या विभागातील बदल्यांचासुद्धा घाट घातला जात आहे. आपल्याला माहीत आहेच की, यापूर्वी पोलीस दलात झालेल्या महाभ्रष्टाचारात थेट राज्याच्या गृहमंत्र्यांनाच जेलमध्ये जावे लागले आहे. महाराष्ट्राच्या व्यापक हिताच्या दृष्टीने आणि जनतेच्या हक्काच्या असलेल्या या निधीच्या गैरवापरात आपण तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी दरेकर यांनी राज्यपालांकडे केली आहे.

# विधानसभा उपाध्यक्षांना कारवाईचा अधिकार नाही!

**मुंबई : प्रतिनिधी**

एकनाथ शिंदे गटाचे १२ आमदार अपात्र ठरविण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे. १२ आमदारांवर विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ कारवाई करणार असल्याचे सांगण्यात आले आहे. या वृत्तानंतर उपाध्यक्षांना तो अधिकारच नसल्याचा दावा शिंदे गटाकडून केला जात आहे. या संदर्भात दोन अपक्ष आमदार महेश बालदी आणि विनोद अग्रवाल यांनी उपाध्यक्षांना पत्र दिले आहे.

एकनाथ शिंदे गटाने दोन दिवसांपूर्वीच विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव दाखल केला आहे. विधानसभा नियमान्वये नरहरी झिरवळ यांना हटविण्यासंदर्भात यापूर्वीच पत्र दिले असल्याने आमदारांच्या अपात्रतेचे अधिकार नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. यासाठी २०१६च्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा दाखल पत्रात दिला आहे. एखाद्या विधानसभा अध्यक्ष किंवा उपाध्यक्षांविरोधात जर अविश्वास प्रस्ताव आणला





दोन अपक्ष आमदारांचा दावा

असेल, तर त्यांना सदस्यांच्या अपात्रतेबाबत कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार नाही, असे या पत्रात नमूद केले आहे. याआधी अध्यक्ष किंवा उपाध्यक्षांना हा प्रस्ताव मंजूर करून घ्यावा लागतो आणि त्यानंतरच त्यांना सदस्यांच्या अपात्रतेविषयी निर्णय घेण्याचा अधिकार आहे.विधानसभा उपाध्यक्षांविरोधात अविश्वास प्रस्ताव आणला गेला असून त्यांना आता आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय घेता येणार नाही, तसेच शिवसेना आमदारांना उत्तर देण्यासाठी सात दिवसांचा अवधीही द्या, असे या पत्रात म्हटले आहे.

# काँग्रेसमधील अंतर्गत मतभेद पुन्हा आले चव्हाट्यावर

## नाना पटोलेंच्या 'त्या' निर्णयावर बड्या नेत्याची नाराजी

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे यांनी बंड पुकारल्यामुळे राज्यातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. या सगळ्या घाडमोडी घडत असताना काँग्रेसमधील मतभेद पुन्हा एकदा समोर आले आहेत. काँग्रेसमधील एक बडे नेते हे त्यांच्याच प्रदेशाध्यक्षांच्या आणि पक्षश्रेष्ठींच्या निर्णयावर नाराज असल्याचे चित्र आहे.

काँग्रेसचे नेते आणि राज्याचे मदत व पुनर्वसनमंत्री विजय वडेट्टीवार यांनी, राज्यात सध्या राजकीय पेच निर्माण झाला असताना विधानसभा अध्यक्षांना महत्त्व असते. सध्याच्या घडामोडी पाहता हे खरे आहे की, आता काँग्रेसला महत्त्व आले असते, पण आमची मते उघड बोलता येत नाही. आमच्या लोकांनी फार घाई केली हे मान्य आहे, अशा शब्दांत विजय वडेट्टीवार यांनी नाना पटोले यांच्या निर्णयावर नाराजी व्यक्त केली.

अध्यक्षाला महत्त्व निर्माण झालेय. काँग्रेसने राजीनामा देऊन फार मोठी चूक केली. आता काँग्रेसला पुन्हा एकदा महत्त्व प्राप्त झाले असते, पण काँग्रेसची एक चूक आणि गेली दोन वर्षे अध्यक्षांविना कामकाज सुरू आहे, असे म्हणाले आहेत.

विधानसभेच्या २०१९च्या निवडणुकीनंतर राज्यात महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाले. त्यानंतर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची विधानसभेचे अध्यक्ष म्हणून निवड झाली होती, पण अवघ्या वर्षभरात काँग्रेसने नाना पटोले यांना अध्यक्षपदावरून पायउतार होण्याच्या सूचना दिल्या. यानंतर नाना पटोलेंवर प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली होती, पण काँग्रेसचा तोच निर्णय चुकला, असे वडेट्टीवार म्हणाले.

# गणेशोत्सवानिमित्त कोकणासाठी एसटीच्या दोन हजार ५०० जादा गाड्या

**मुंबई : प्रतिनिधी**



गणेशोत्सवानिमित्त कोकणात जाणाऱ्या रेल्वेगाड्या आरक्षित झालेल्या असतानाच एसटी महामंडळाने जादा गाड्या सोडण्याची तयारी पूर्ण केली आहे. यंदा गणेशोत्सवनिमित्त कोकणासाठी एसटी महामंडळाने अडीच हजार जादा गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे.

यातील २५ ऑगस्टपासून सुटणाऱ्या एक हजार ३०० जादा गाड्यांचे आरक्षण शनिवारपासून (दि. २५) सुरु होणार आहे. जादा गाड्या मुंबई, ठाणे, पालघरमधून जातील. या गाड्यांचे आरक्षण तिकीट खिडक्या, ऑनलाइन आणि एसटी महामंडळाकडून नियुक्त एजंटकडूनही मिळणार आहे. या जादा गाड्यांव्यतिरिक्त ग्रुप आरक्षणासाठीही लवकरच एसटी उपलब्ध केल्या जातील. या गाड्यांचे आरक्षण पूर्ण झाल्यास अधिक गाड्या सोडण्याची तयारी एसटी महामंडळाने ठेवली आहे.

यंदा गणेशोत्सवाला ३१ ऑगस्टपासून सुरुवात होत आहे. अनेक जण साधारण चार ते पाच दिवस आधीच गणेशोत्सवासाठी कोकणात जातात. यंदा रेल्वेगाड्यातील आरक्षण संपल्याने एसटी महामंडळाने जादा गाड्यांची घोषणा करून दिलासा दिला आहे.

# कोप्रोलीचे कृषिसेवा केंद्र सुरू

## भाजप उरण तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड यांच्या प्रयत्नांना यश

**उरण : वार्ताहर**

तालुक्यातील कोप्रोली येथील जे. पी. पाटील कृषिसेवा केंद्र तांत्रिक अडचणी आल्याने २१ जून ते २३ जूनपर्यंत बंद होते. भाजप उरण तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड यांच्या प्रयत्नाने अखेर शुक्रवारी (दि. २४) पासून खतविक्री सेवा पूर्ववत करण्यात आली आहे.

कृषिसेवा केंद्राचे जगजीवन पाटील यांना खत विक्री परवानाबद्दल उरण कृषी अधिकारी यांनी विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, खत विक्री परवाना नूतनीकरण करण्यासाठी अलिबाग येथे पाठविले आहे, ते आल्यानंतर दाखवितो, परंतु कृषी अधिकाऱ्यांनी तडकाफडकी सेवाकेंद्र बंद करण्याचे आदेश दिले. ही बाब भाजप तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड यांच्या लक्षात येताच त्यांनी याबाबत पाठपुरावा केला. या समस्येवर मार्ग काढून शुक्रवारपासून जे. पी. कृषीसेवा केंद्र सुरू करण्यात आले. त्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून त्यांनी मुकुंद गावंड यांचे आभार मानले आहेत.

**जे. पी. पाटील सेवा केंद्रात खत वाजवी भावात मिळते व वेळेवर मिळत आहे. केंद्र बंद असल्याने आमची गैरसोय झाली होती, मात्र मुकुंद गावंड यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे आम्हाला दिलासा मिळाला आहे.**
**–गणेश गावंड, शेतकरी**

**शेतकऱ्यांना वेळेवर खत मिळणे महत्त्वाचे आहे, नाही तर शेतकऱ्यांच्या भातशेतीचे नुकसान होते. खत विक्रीसेवा केंद्रांना जे कागद पत्र लागतात, त्याबद्दल थोडी मुभा द्यावी. कागदपत्र सादर करण्यासाठी काही अवधी लागतो. त्याचा विचार करून शेतकऱ्यांना सहकार्य करावे.**
**–मुकुंद गावंड, भाजप उरण तालुका उपाध्यक्ष**

# रायगड जिल्हा पोलीस कार्यक्षेत्र हद्दीत मनाई आदेश जारी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

राज्यात निर्माण झालेली राजकीय अस्थिरता, मोहम्मद पैंगबर यांच्याबद्दल केलेल्या आक्षेपार्ह वक्तवाच्या निषेधार्थ मुस्लीम संघटनांकडून विविध आंदोलने, तसेच अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत उपोषणाच्या घटना या सर्व बाबी लक्षात घेऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी २५ जून ते ८ जुलै या कालावधीकरीता रायगड जिल्हा पोलीस कार्यक्षेत्र हद्दीत मनाई आदेश जारी करण्यात आले आहेत.

या कालावधीत होणारे उत्सव, सभा, मिरवणुकांना परवानगी देण्याचे अधिकार तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांना देण्यात आले आहेत. विपरित परिस्थिती उद्भवल्यास त्याची जबाबदारी आयोजकांवर राहिल, असे आदेश जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी जारी केले आहेत.

# पालखी सोहळ्यात चोरट्यांचा सुळसुळाट

## ६० जणांना ठोकल्या बेड्या

**पुणे : प्रतिनिधी**

जगद्गुरु संत तुकाराम महाराज, संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या दोन्ही पालख्या पुण्यातून पंढरपूरकडे मार्गस्थ झाल्या आहेत. कोरोनानंतरचा पहिलाच पालखी सोहळा असल्याने या वर्षी वारकऱ्यांची मोठी गर्दी झाली होती. याच गर्दीचा फायदा घेऊन अनेक चोरट्यांनी वारकरी भाविकांचे मंगळसूत्र, पाकिटांवर डल्ला मारला आहे. पिंपरी–चिंचवड पोलिसांना अशाच ६० जणांना पकडण्यात यश आले असून त्यांच्याकडून तब्बल साडेपाच लाखांचे सोन्याचे दागिने पोलिसांनी जप्त केले.

देहू, आळंदी परिसरात पालखी सोहळ्यासाठी आलेल्या २२५ संशयित व्यक्तींना पोलिसांनी ताब्यात घेतले होते. त्यापैकी ६० जणांना पोलिसांनी रंगेहाथ पकडले आहे. दोन वर्षानंतर पालखी सोहळा वारकऱ्यांच्या उपस्थित पार पडला. त्यामुळे झालेल्या मोठ्या गर्दीचा फायदा चोरटे उचलत होते.

पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, देहू, आळंदीत पालखी सोहळ्यादरम्यान गुन्हे शाखा आणि पोलिसांची आठ पथक नेमण्यात आली होती. ते दिवस– रात्र गस्त घालत होते. हे सर्व अधिकारी कर्मचारी साध्या आणि वारकऱ्यांच्या वेशात फिरत होते.

# डॉ. विजय चोरमारे यांचे आज व्याख्यान

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांचे अनमोल योगदान आहे. हे वर्ष शाहू महाराजांचे स्मृतिशताब्दी वर्ष म्हणून साजरे होत आहे. त्या अनुषंगाने शनिवारी (दि. २५) राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीदिनाच्या पूर्वसंध्येला आधुनिक क्रांतीचे राजर्षि या विषयावर साहित्यिक तथा राजर्षि शाहू महाराज चरित्र साधने प्रकाशन समितीचे सदस्य सचिव डॉ. विजय चोरमारे यांचे व्याख्यान आयोजित केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृहात सायं. ७ वाजता हे व्याख्यान होणार असून नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन केले आहे.

# कर्मयोगी नमो लघुपट स्पर्धेचा उद्या पारितोषिक वितरण समारंभ

**पुणे : प्रतिनिधी**

भाजप सांस्कृतिक प्रकोष्ठच्या वतीने आयोजित कर्मयोगी नमो लघुपट स्पर्धेचा रविवारी (दि. २६) कोथरुडमधील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात पारितोषिक वितरण समारंभ होणार असून, विजेत्यांना भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील, ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले, प्रशांत दामले, मृणाल कुलकर्णी या मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार असल्याची माहिती भाजप प्रदेश सांस्कृतिक प्रकोष्ठचे ॲड. शैलेश गोजमगुंडे यांनी दिली.

ते म्हणाले की, स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त भाजप सांस्कृतिक प्रकोष्ठ महाराष्ट्र प्रदेशच्यावतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकिर्दीवर लघुपट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. देशभरातून एकूण १३५ स्पर्धकांनी या स्पर्धेतून सहभाग घेत, एक ते १२ मिनिटांचे लघुपट सादर केले होते. यापैकी, काही निवडक लघुपट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वत: पाहून विशेष पसंती दर्शवली. त्यापैकी, उत्कृष्ट लघुपटांना पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

येत्या रविवारी सकाळी ९ वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास मानसी मागीकर, युवा नाट्य सिनेअभिनेता आरोह वेलणकर हेदेखील उपस्थित राहणार आहेत. या समारंभास पुणेकरांनी उपस्थित राहण्याचे आवाहन प्रकोष्ठच्या वतीने करण्यात आले आहे.

पान १ वरून

# भूमिपुत्रांचा पुन्हा एल्गार

लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांचेच नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला द्यावे तसेच प्रकल्पग्रस्तांचे विविध प्रलंबित प्रश्न मार्गी लावावेत यासाठी 'दिबां'च्या स्मृतिदिनी सिडकोविरोधात घेराव आंदोलन करण्यात आले. साडेबारा टक्क्यांचा कायदा दि. बा. पाटील यांच्यामुळेच अस्तित्वात आला. म्हणून एकवेळ भूगोल बदलेल, पण इतिहास बदलणार नाही अशी जोरदार गर्जना करीत 'दिबां'चा जयजयकार या वेळी संपूर्ण आसमंतात दुमदुमला. घेराव आंदोलन म्हणजे असंतोषाची एक ठिणगी होती. त्याचा वणवा होण्याआधी सिडको व राज्य सरकारने भूमिपुत्र व प्रकल्पग्रस्तांच्या सर्व मागण्या पूर्ण कराव्यात, असा इशारा या आंदोलनातून देण्यात आला. 'दिबां'चे नाव विमानतळाला लागेपर्यंत आणि भूमिपुत्रांच्या विविध मागण्या पूर्ण होईपर्यंत हा लढा कायम राहणार असल्याचे प्रकल्पग्रस्तांच्या नेतृत्वाकडून या ठिकाणी सांगण्यात आले.

लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीच्या नेतृत्वाखाली बेलापूर सीबीडी येथील क्रोमा इलेक्ट्रॉनिक्स येथून सकाळी १०.३० वाजता आंदोलनाला सुरुवात झाली. त्यानंतर भूमिपुत्रांचे हे वादळ सिडको भवनाजवळ धडकले. या वेळी कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी मंत्री व विद्यमान आमदार गणेश नाईक, माजी मंत्री जगन्नाथ पाटील, माजी खासदार संजीव नाईक, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार मंदा म्हात्रे, माजी आमदार संदीप नाईक, पनवेलच्या महापौर कविता चौतमोल, रणरागिणी भारतीताई पोवार, उपमहापौर सीताताई पाटील, कॉम्रेड भूषण पाटील, सभागृह नेते परेश ठाकूर, ओबीसी नेते राजाराम पाटील, कामगार नेते महेंद्र घरत, दशरथ भगत, नंदराज मुंगाजी, जगदिश गायकवाड, संतोष केणे, गुलाबराव वझे, वाय. टी. देशमुख, जे. डी. तांडेल, नवी मुंबईचे माजी महापौर सागर नाईक, जयवंत सुतार, सुधाकर सोनावणे, रामचंद्र घरत, अर्जुन चौधरी, डॉ. राजेश पाटील, मनोहर पाटील, राजेश गायकर, विनोद म्हात्रे, सीमा घरत, नेत्रा शिर्के यांच्यासह अन्य लोकप्रतिनिधी, आजी माजी नगरसेवक–नगरसेविका, सर्वपक्षीय समित्या, भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रकल्पग्रस्तांच्या प्रमुख मागण्यांमध्ये प्रकल्पग्रस्तांचे शिक्षण, नोकरी, साडेबारा टक्के भूखंड, गरजेपोटी बांधलेली बांधकामे, गावठाण विस्तार, विमानतळबाधित २७ गावांच्या समस्या, यापूर्वी सिडकोत अनेक ठराव होऊनही प्रकल्पग्रस्तांचे गरजेपोटीची बांधकामे नियमित केली जात नाहीत. नुकत्याच केलेल्या शासन निर्णयात २५० मीटरचे निकष, भाडेपट्टा अशा अनेक त्रुटी असल्याच्या तक्रारी आहेत. सिडकोच्या भूमिकेचा निषेध करण्यासाठी व मागण्या मान्य करून घेण्यासाठी हे आंदोलन महत्त्वाची भूमिका बजावणारे ठरणार आहे.

या आंदोलनाचे प्रास्ताविक कृती समितीचे कार्याध्यक्ष तथा भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकातून आजपर्यंतच्या लढाईची माहिती देत 'दिबां'च्या नावाचा जयजयकार केला.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव द्यावे या मागणीसाठी रायगड, ठाणे, पालघर, मुंबई आदी जिल्ह्यांतील प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांनी मागील वर्षी १० जूनला भव्य साखळी आंदोलन, २४ जूनला ऐतिहासिक सिडको घेराव आंदोलन, ९ ऑगस्टला क्रांतिदिनी मशाल मोर्चा, १७ मार्च रोजी भुमिपूत्र परिषद, सिडको वर्धापन दिनी काळा दिन आंदोलन, २४ जानेवारीला विमानतळ काम बंद आंदोलन अशी भव्य आंदोलने केली. त्यानंतर आजही आंदोलनाची धार प्रखर करीत सिडकोच्या उरात धडकी भरविण्यात आली. या वेळी आगरी–कोळी भाषेतील 'दिबां'वर आधारित गाणी गाऊन लोकगीत गायक जगदिश पाटील यांनी आंदोलनात आणखी उत्साह आणला.

**दि. बा. पाटील होणे सोपे नाही. एक बाजूला कुबेर असताना त्यांनी जनता निवडली आणि जनतेसाठी लढत राहिले. मंडल आयोगाची मागणी त्यांच्यामुळे पूर्ण झाली. गाव तेथे शाळा, घर तेथे काम हे 'दिबां'नी उद्दिष्ट ठेवले. ते सर्व समाजाचे नेते होते. त्यामुळे त्यांचे नाव विमानतळाला मिळालेच पाहिजे.**
**–भारती पोवार,**
**१९८४ सालच्या लढ्यातील रणरागिणी**

**ज्या सरकारने नाव देण्याचे अमान्य केले त्या सरकारविरोधात उद्यापासून न्यायालयीन लढाई सुरू होणार आहे.**
**–राजाराम पाटील, ओबीसी नेते**

**जोपर्यंत 'दिबा'साहेबांच्या नावाचे विमान उडत नाही तोपर्यंत लढाई सुरूच राहणार आहे. मला एकदा तडीपार केले, पण 'दिबा'साहेबांच्यासाठी दुसऱ्यांदा झालो तरी चालेल. विमानतळात ९५ गावांतील प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या मिळाल्या पाहिजेत. बडबड नाही, तर कृती करण्याचे काम समिती करीत आहे.**
**–जगदिश गायकवाड,**
**माजी महापौर, पनवेल महानगरपालिका**

**भगवान के घर देर है, अंधेर नही. सिडकोने केलेला ठराव नक्की विखंडित होईल. राज्य सरकारकडून प्रस्ताव गेल्यांनतर केंद्र सरकार गांभीर्याने लक्ष देईल.**
**–जगन्नाथ पाटील, माजी मंत्री**

**मागील वर्षी दोन वेळा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासोबत बैठका झाल्या, पण त्यांनी जनतेच्या भावना जाणल्या नाहीत. ज्या राजाने जनतेच्या भावना लक्षात घेतल्या नाहीत त्याची आता काय अवस्था झाली आहे.**
**–कॉम्रेड भूषण पाटील**





पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
शनिवार, दि. २५ जून २०२२ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)
कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स
सर्व केंद्रांवर (वयोगट : १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी–१, गावदेवी पाडा, पनवेल ■ २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी–४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी–६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.

# पनवेलमध्ये पथविक्रेत्यांना भांडवली सहाय्य

## प्रधानमंत्री स्वनिधी योजनेंतर्गत महापालिकेतर्फे मदत

**पनवेल : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री स्वनिधी योजनेंतर्गत महापालिकेच्या वतीने १० हजारांचे पथविक्रत्यांना भांडवल सहाय्य म्हणून खेळते भांडवल कर्ज स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येत आहे. नियमित परतफेड करण्यास प्रोत्साहन देणे, डिजीटल व्यवहारास प्रोत्साहन देणे या उद्देशाने ही योजना सुरू करण्यात आली आहे. १० हजारांचे प्रथम कर्ज वेळेत परतफेड केल्यानंतर २० हजारांचे कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

नगरपथविक्रेते अनौपचारिक नागरी अर्थव्यवस्थेचा अत्यंत महत्वाचा घटक आहे. नगरवासीयांच्या आर्थिक कुवतीप्रमाणे स्वस्त दरात वस्तू व सेवांची उपलब्धता सुनिश्चित करण्यात ते महत्वपूर्ण भूमिका बजावतात. कोविड- १९च्या काळात टाळेबंदीमध्ये पथविक्रेत्यांच्या उपजिविकेवर विपरित परिणाम झाला आहे. त्यामुळे पथविक्रेत्यांच्या व्यवसायास खेळत्या भांडवलांचा पतपुरवठा तातडीने करण्याच्या उद्देशाने केंद्र शासन पुरस्कृत पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी पथविक्रेत्यांसाठी विशेष सुक्ष्म पतपुरवठा सुविधा योजनेची राज्यात अंमलबजावणी



करण्यात येत आहे. या योजनेच्या अधिक माहितीसाठी व नोंदणीसाठी www.pmsvanidhi.mohua.gov.in या वेबसाईटवर संपर्क करावा, असे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.

पनवेल महानगरपालिका कार्यालयात डेनयुलएम विभागाच्या विनया म्हात्रे (८०९७०४४८४४), नवनाथ थोरात (९८५०७२५५८४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले.

### लाभार्थी पात्रता निकष

दिनांक २४ मार्च २०२० रोजी व त्यापूर्वीचे पथविक्रेते, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने प्रदान केलेले विक्री प्रमाणपत्र अथवा ओळखपत्र असलेले पथविक्रेते, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात आढळलेले, परंतु त्यांना विक्री प्रमाणपत्र अथवा ओळखपत्र दिले गेले नाही असे पथविक्रेते, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात जे पथविक्रेते वगळलेले आहेत किंवा ज्यांनी सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर विक्री सुरू केली आहे आणि त्यास नागरी संस्थांनी किंवा नगर पथविक्रेता समितीने शिफारसपत्र जारी केले आहे. आसपासच्या विकास अथवा पेरी-शहरी अथवा ग्रामीण भागातील पथविक्रेते नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या भौगोलिक क्षेत्रामध्ये पथविक्री करतात आणि त्यास नागरी संस्थेने किंवा नगर पथविक्रेता समितीने शिफारसपत्र जारी केलेले आहे.

### लाभाचा तपशील

नागरी पथविक्रेते एक वर्षाच्या परतफेड मुदतीस १० हजार रुपयांपर्यंतचे खेळते भांडवल कर्ज घेण्यास आणि त्याची दरमहा हप्त्याने परतफेड करण्यास पात्र असतील. या कर्जावर आरबीआय च्या प्रचलित दराप्रमाणे व्याज दर लागू राहतील. विहीत कालावधी मध्ये कर्ज परतफेड केल्यास सात टक्के व्याज अनुदान मिळण्यास पात्र असतील.

### आवश्यक कागदपत्रे

आधारकार्ड, बँक पासबुक, रेशनकार्ड, बाजार फी वसुली पावती, आधारलिंक मोबाईल नंबर पासपोर्ट साईज फोटो ही कागदपत्रे आवश्यक आहेत.

# जासई विद्यालयात लोकनेते दि. बा. पाटील यांची पुण्यतिथी

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील जुनियर कॉलेजमध्ये लोकनेते दि. बा. पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी १९८४च्या लढ्याचे नेतृत्व केलेल्या रणरागिणी भारतीताई पवार, शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्षआणि भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय महामंत्री सुरेश पाटील, दि. बा. पाटील यांचे चिरंजीव अतुल पाटील तसेच लता सरनाईक, प्रभाकर पाटील, सुभाष पाटील, महेश लाड, जासई गावचे सरपंच संतोष घरत, धर्मा पाटील, ह. भ. प. धावजी महाराज, ह. भ. प. गोपीनाथ ठाकूर, यशवंत घरत, डी. आर. ठाकूर, अमृत ठाकूर, अविनाश पाटील अशा अनेकांची उपस्थिति लाभली होती.



विद्यालयाचे प्राचार्य आणि रयत शिक्षण संस्थेचे लाइफ वर्कर अरुण घाग व विद्यालयाचे सर्व सेवक वृंद व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. विद्यालयाच्या प्रांगणातील पंच महा विभूतींच्या पुतळ्यांचे पूजन तसेच कर्मवीर अण्णांच्या पुतळ्याचे व दि. बा. पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी भारतीताई पवार यांच्या हस्ते पालखीचे पूजन करून सर्व मान्यवरांनी पालखीचे पूजन भक्तिभावाने केले. पालखीची मिरवणूक गावातून ढोल-ताशांच्या लेझिम पथकाच्या गजरात काढण्यात आली. या पालखी सोहळ्यात मोठ्या संख्येने जनसमुदाय सामील झाला होता. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक नुर शेख यांनी केले.





पनवेल : लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांच्या स्मृतीदिनानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी 'दिबां'च्या संग्राम येथील निवासस्थानी जाऊन त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, खजिनदार जे. डी. तांडेल, उपमहापौर सीताताई पाटील, सभागृह नेते परेश ठाकूर, नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, मनोहर म्हात्रे, प्रभाग समिती 'ड'च्या सभापती ॲड. वृषाली वाघमारे, नगरसेविका चारुशीला घरत, जितेंद्र वाघमारे, संजय जैन, सदानंद पाटील आदी उपस्थित होते.



पनवेल : लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त आगरी समाज मंडळाच्या पनवेल येथील सभागृहात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिवादन केले.



पनवेल : लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांच्या स्मृतीदिनानिमित्त भाजपच्या पनवेल येथील मध्यवर्ती कार्यालयात अभिवादन करण्यात आले. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, सभागृह नेते परेश ठाकूर, नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील आदींनी अभिवादन केले.

# कळंबोलीत देहव्यापार करणाऱ्या तृतीयपंथीयांवर कारवाईची मागणी

## भाजपच्या रविनाथ पाटील यांचे पोलिसांना निवेदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कळंबोली मार्बल मार्केट व या ठिकाणी असलेल्या पेट्रोल पंपाच्या परिसरात तृतीयपंथी हे देहव्यापार करीत आहे. त्यामुळे या परिसरातील रहिवाशांना त्रास होत असून महिलांना वावरणेही मुश्कील झाले आहे. त्यामुळे देहव्यापार करणाऱ्या या तृतीयपंथीयांवर कारवाई करावी; अन्यथा तीव्र रोशाला सामोरे जावे लागेल, असा इशारा भाजपचे कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील यांनी दिला आहे.

तळोजा बायपास रोड लागत असलेल्या पेट्रोल पंपाच्या आजूबाजूच्या परिसरात तृतीयपंथीयांनी हैदोस माजवला असून, देह व्यापार खुले आम सुरू आहेत. त्यामुळे या परिसरात लुटमारीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे, तसेच ये-जा करणाऱ्या महिलांवरही या ठिकाणी उभे असलेले ग्राहक वाईट नजरेने बघत आहे. त्यामुळे महिलांना वावरण्यासही त्रास होत आहे. तसेच रात्रीच्या वेळी हा परिसर धोकादायक बनत असून कोणतीही मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता आहे.

या विरोधात भाजपने आवाज उठवला असून, देह व्यापार करणाऱ्या तृतीयपंथीयांवर कारवाई करून त्यांना तेथून हटवण्याच्या मागणीचे निवेदन कळंबोली भाजपचे शहर अध्यक्ष रविनाथ पाटील यांनी कळंबोली शहर पोलीस ठाण्याच्या सहाय्यक निरीक्षकांना दिले आहे. तसेच कारवाई न झाल्यास भाजप महिला मोर्चा पुढाकार घेऊन त्यांना तथून हटवेल, असा इशारा दिला आहे.



# चेन स्नॅचिंग करणारा सराईत गुन्हेगार अटकेत

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल, नवी मुंबईसह इतर भागात चेन स्नॅचींग करणाऱ्या सराईत लुटारुला पकडण्यात तुर्भे एमआयडीसी पोलिसांना यश आले आहे. शेरू उर्फ सलमान साजीद जाफरी (वय २०) असे या लुटारूचे नाव असून त्याने आपल्या साथीदाराच्या मदतीने चेन स्नॅचिंगचे अनेक गुन्हे केल्याचे उघडकीस आले आहे. त्यानुसार या आरोपीच्या सहकाऱ्यांचा शोध घेण्यात येत असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

आरोपी शेरूने तुर्भे एमआयडीसीतील कंपनीत कामाला जाणाऱ्या एका महिलेच्या गळ्यातील ७० हजार रुपये किंमतीचे १४ ग्रॅम वजनाचे दागिने लुटून पलायन केले होते. याबाबत तुर्भे एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी परिसरात पाळत ठेवून आरोपी शेरूला ताब्यात घेतले. त्याची चौकशी करून त्याने लुटलेले ७० हजार रुपये किंमतीचे दागिने हस्तगत केले. त्याने साथीदाराच्या मदतीने चेन स्नॅचींगचे गुन्हे केल्याची कबुली दिली.

# पनवेल परिसरात अपघातांमध्ये दोन ठार; एक जण जखमी

**पनवेल :** परिसरात झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातांमध्ये दोघे ठार व एक जखमी झाला आहे. पनवेलजवळील जुना मुंबई-पुणे हायवे रस्त्यावर एका मोटरसायकलीस त्यांच्या पाठीमागून येणाऱ्या कंटेनरचालकाने धडक मारली. या अपघातात मोटरसायकलीवर दोघे जण खाली पडले. दरम्यान, त्याचवेळी दुसऱ्या कंटेनरने आयरिन सुसान जोसेफ (वय १९) हिच्या मांडीला व पोटाला टायर घासून गेल्याने जखमी होऊन तिचा मृत्यू झाला. तर तिच्याबरोबर असलेल्या गोवर्धन गोपी (वय २२) हा जखमी झाला आहे. या अपघाताची नोंद तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

दुसऱ्या घटनेत कोळखेजवळील वेल्वेट ट्रीट गार्डन हॉटेलजवळ असलेल्या महिंद्रा शोरूमसमोर एका ट्रेलरने मोटरसायकलीस धडक दिली. या अपघातात मोटरसायकलीवरील राजीव पेडणेकर (वय ४२, रा. कामोठे) याचा मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# शोभिवंत फुलझाडांनी जेएनपीए महामार्ग बहरला

**उरण : प्रतिनिधी**

जेएनपीए-गव्हाण फाटा, कळंबोली- जेएनपीटी-पळस्पे या एनएच-४ बी आठ पदरी राष्ट्रीय महामार्गावरील दुभाजकांवर सुमारे दोन लाख विविध प्रकारची आकर्षक शोभिवंत फुलझाडे लावण्यात आली आहेत. दोन वर्षांपूर्वी लागवड करण्यात आलेली फुलझाडे चांगलीच बहरली आहेत. या आकर्षक फुलझाडांमुळे दररोज या महामार्गावरून ये-जा करणाऱ्या १५ हजारांहून अधिक वाहतुकदार, प्रवासी, नागरिकांचा प्रवास आकर्षक आणि डोळ्यांनाही सुखावणारा ठरू लागला आहे.

जेएनपीए-मुंबई पोर्ट रोड कंपनीच्या माध्यमातून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने बंदरातील वाढती अवजड वाहतूक सुकर व्हावी आणि वाहतूक कोंडीची समस्या दूर करण्यासाठी जेएनपीएदरम्यान असलेल्या गव्हाणफाटा-जासई-करळ-द्रोणागिरीदरम्यान राष्ट्रीय एनएच-४ बी महामार्गावर सात उड्डाणपूल, एलिव्हेटेड कॉरिडॉर आणि आठ पदरी रस्ते तयार करण्यात आले आहेत. सुमारे तीन हजार कोटी खर्चाचे काम नॅशनल हायवे अथॅरिटीकडे सोपविण्यात आले आहे.

यापैकी उड्डाणपूलाची काही कामे प्रगतीपथावर आहेत. तर उर्वरित जेएनपीटी-गव्हाण फाटा आणि कळंबोली-जेएनपीटी-पळस्पे या एनएच-४ बी राष्ट्रीय महामार्गावरील सहा-आठ पदरी ४२ किमी लांबीच्या रस्त्यांची कामे पुर्ण झाली आहेत. परिसरातील वाढत्या प्रदूषणाचे संतुलन साधण्यासाठी जीव्हीकेच्या माध्यमातून सुरू असलेल्या या जेएनपीएदरम्यान असलेल्या गव्हाण फाटा-जासई-करळ-द्रोणागिरीदरम्यान राष्ट्रीय एनएच-४ बी महामार्गावर एलिव्हेटेड कॉरिडॉर आणि आठ पदरी महामार्गावरील रस्त्यांच्या दुभाजकावर सुमारे दोन लाख शोभिवंत फुलझाडे लावण्याची योजना आखण्यात आली होती.

यामध्ये कन्हेरी फुलझाडांच्या जातीतील बिंटी, बोंगणवेल, टिकोमा, तगर, जास्वंद, पॅरेलॉनकस आदी आकर्षक फुलझाडांचा समावेश आहे. यासाठी कोट्यावधी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. रस्ते उभारणीसह फुलझाडांची लागवड आणि देखभाल करण्याचे कामही जीव्हीकेकडे सोपविण्यात आले आहे. या महामार्गावर आणि सहा-आठ पदरी रस्त्यांच्या दुभाजकावर लावण्यात आलेली शोभिवंत आकर्षक फुलझाडांची मागील दोन वर्षात चांगलीच बहरली, फोफावली आहेत.



### पर्यावरणाचे संतुलन राखण्यासही मदत

*या महामार्गावरील लावण्यात आलेल्या आकर्षक व विविध प्रकारच्या शोभिवंत फुलझाडांच्या लागवडीमुळे महामार्गावरून ये-जा करणाऱ्यांना प्रसन्नता लाभते. तसेच परिसरात ढासळत्या पर्यावरणाचे संतुलन राखण्यासही मोलाची मदत होत आहे. शिवाय दुभाजकांवर लावण्यात आलेल्या फुलझाडांमुळे रात्रीच्यावेळी परस्पर विरुध्द धावणाऱ्या वाहनांच्या लाईटसचे रिप्लेक्शन एकमेकांवर न पडण्यासही मदत मिळते. त्यामुळे रात्रीच्या वेळी लाईटस् रिप्लेक्शनमुळे होणारे अपघात कमी होण्यास मदत मिळत असल्याची माहिती राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे सहव्यवस्थापक यशवंत घोटकर यांनी दिली आहे.*

# लिमये महाविद्यालयात योग प्रशिक्षण सप्ताह

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय संस्कृती संपूर्ण जगामध्ये योगामुळे वैशिष्ट्यपूर्ण ओळखली जाते, त्यामुळेच २०१५पासून २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून साजरा केला. शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये (एसएमडीएल) महाविद्यालयामध्ये एन. एस. एस. विभागातर्फे योग फॉर हेल्थ हारमनी पीस या विषयावर व्यायाम, योगा व प्राणायाम यांचे प्रशिक्षण दि. १४ ते २१ जून २०२२ या काळात सकाळी ८ ते १० या वेळेत उत्साहात देण्यात आले.



सात दिवस स्वयंसेवकांना प्रशिक्षण देण्याचे काम योग आचार्य शाम सिंग (पतंजली योग समिती - दादरी, दिल्ली) यांनी उत्कृष्टपणे केले. त्याचप्रमाणे योगशिक्षिका पुनम विनोद कदम व श्याम सिंग यांनी २१ तारखेला प्रात्यक्षिकांसह शास्त्रशुद्ध माहिती दिली. या कार्यक्रमाच्या वेळी आयोजक व योग मार्गदर्शक प्रा. डॉ. बी. बी. जाधव (जिल्हा समन्वयक, एन. एस. एस.) हे होते.

या योग साधनेचे प्रशिक्षण महाविद्यालयाने आयोजित केल्याने सुधागड एज्युकेशन सोसायटीचे संचालक राजेंद्र पालवे यांनी समाधान व्यक्त केले. प्रशिक्षणामध्ये भाग घेतलेल्या स्वंयसेवकांमधून प्रथम कोमल जाधव, द्वितीय - निखील इंगळे व जय भोसले तर तृतीय क्रमांक शारदा भोसले यांनी पटकावून प्रशस्तीपत्रक मिळविले. तर उत्कृष्ट सूर्यनमस्कार काढण्यामध्ये प्रथम श्रद्धा कुंभार, द्वितीय मंजुश्री सुळे व तृतीय क्रमांक साक्षी ननावरे यांनी पटकावून प्रशस्तीपत्रक पाहुण्यांच्या हस्ते स्वीकारले.

या कार्यक्रमासाठी सहाय्य महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. एम. एन. बनसोडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. बी. बी. जाधव यांनी केले. तर उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. भारती आरोटे यांनी मानले. एन. एस. एस. सर्व लिडर यांनी सात दिवस कार्यक्रमाच्या व्यवस्थापनात मोलाचे काम केले. स्वंयसेवकांसोबत प्रा. प्रतिक्षा माळी, डॉ. भारती आरोटे, प्रा. जया मॅडम यांनीही मार्गदर्शन केले.

## संपादकीय

# सरकार कार्यरत आहे?

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या शुक्रवारच्या भावनिक आवाहनानंतर बंडखोर आमदारांची कार्यालये दगडफेकीची लक्ष्य ठरली. काही ठिकाणी बंडखोर नेत्यांच्या होर्डिंगवर काळे फासण्यात आले. हे असे घडणे स्वाभाविकच होते. येत्या काही काळात हा प्रश्न सामोपचाराने सुटला नाही तर परिस्थिती बिघडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्नही निर्माण होऊ शकतो याचे भान राज्य सरकारने ठेवायला हवे, परंतु मुळात महाविकास आघाडीचे सरकार कार्यरत आहे की, नाही हाच गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे.

**महाराष्ट्रातील सत्तानाट्याचा चौथा दिवसही रणधुमाळीने वाजतगाजत मावळला. गेल्या चार दिवसांत महाराष्ट्रातील राजकारणात इतकी मोठी उलथापालथ झाली आहे की, राज्याचा कारभार कोणी खरोखर चालवते आहे, यावर विश्वासच ठेवता येणार नाही. तिन्ही सत्ताधारी पक्ष निव्वळ आपापल्या खुर्च्या वाचवण्यासाठी धावाधाव करत आहेत. कारण त्यांचेच काही सहकारी खुर्च्यांसकट पळून गेले आहेत. गेल्या ५६ वर्षांत कधीही बघितले नव्हते, असे महासंकट शिवसेना पक्षावर कोसळले आहे आणि त्याचा शेवट अखेरीस नियम-कायद्यानुसार न्यायालयाच्या चौकटीतच होईल, असे स्पष्ट दिसते आहे. शिवसेना पक्षप्रमुख आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी जिल्हा व तालुका प्रमुखांशी ऑनलाइन संवाद साधून शुक्रवारी पुन्हा 'ज्यांना जायचे असेल त्यांनी जावे, माझ्या प्रेमात अडकून पडू नका', असे भावनिक आवाहन केले. बंडखोर नेते एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेचे तब्बल ४० आमदार पळवून नेले असून शिवसेना पक्षप्रमुख ठाकरे यांच्या नेतृत्वासमोर गहिरे प्रश्नचिन्ह उभे केले आहे. बंडखोरांनी तळ गुवाहाटीत ठोकला असला तरी त्यांची पाळेमुळे मुंबई आणि महाराष्ट्रातच आहेत हे विसरून चालणार नाही. शिंदे यांनी सुरू केलेली ही लढाई कायदेशीर मार्गाने आणि रस्त्यावरही लढली जाईल असे ठाकरे समर्थक नेत्यांकडून ठणकावून सांगण्यात आले आहे. तथापि, यापुढील लढाई ही बव्हंशी विधिमंडळ सभागृहात आणि न्यायालयात लढली जाईल हे लक्षात ठेवायला हवे. त्या वाचून कुठलाही पर्याय उरलेला नाही. शिवसेना विधिमंडळ पक्षाचे दोन तृतियांश संख्याबळ नेमके कोणाकडे आहे? पक्षांतरबंदीचा कायदा बंडखोर आमदारांना लागू होऊ शकतो का? विधानसभा उपाध्यक्ष माननीय नरहरी झिरवळ यांच्याकडे शिवसेनेने केलेली १२ बंडखोर आमदारांच्या निलंबनाची शिफारस कायदेशीर आहे का? निवडणूक चिन्ह शिवसेनेकडे राहणार की, शिंदे सेनेकडे? असे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. त्यांची तड कायदेशीर मार्गानेच लागू शकते. रस्त्यावरील लढाई आणि भावनिक आवाहने यांच्या जोरावर फार तर वातावरण निर्मिती करता येईल, परंतु न्याय मिळणे कठीण होईल, याचे भान सर्वच संबंधितांनी ठेवायला हवे. शिवसेनेतील बंडाळीचे सर्व खापर भारतीय जनता पक्षाच्या माथ्यावर फोडण्यात शिवसेना पक्षप्रमुख ठाकरे आणि त्यांच्या नेत्यांनी धन्यता मानली आहे, परंतु प्रत्यक्षात भाजपचा एकही मोठा नेता या सत्तानाट्याच्या आसपासही फिरकताना दिसत नाही. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे जयंत पाटील यांनीही ती वस्तूस्थिती मान्य केली आहे. मनाविरुद्ध घडलेल्या नकारात्मक गोष्टींचे खापर भाजपच्या माथी फोडण्याचे शिवसेनेच्या नेत्यांनी आता तरी थांबवावे. विद्यमान सरकार लवकरच गाशा गुंडाळणार याचीच सारी स्पष्ट लक्षणे दिसत आहेत. जाता जाता तरी नियम-कायद्यांचा सन्मान राखण्याचे सत्कार्य महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून घडावे एवढीच अपेक्षा उरली आहे.**

# सिद्धेश्वर ग्रामपंचायतीची प्लास्टिकमुक्तीकडे वाटचाल







**खबरबात**
**धम्मशील सावंत**

प्लास्टिक बंदीचा कायदा करूनही प्लास्टिकचा भस्मासूर दिवसागणिक वाढत चालला आहे. त्यामुळे या प्लास्टिकचा पुनर्वापर व प्रक्रिया व्हावी यासाठी सुधागड तालुक्यातील सिद्धेश्वर ग्रामपंचायतीने पुढाकार घेतला आहे. यासाठी ५आर मुंबई ही संस्था, रायगड जिल्हा परिषद, सुकन्या संघ, शाळा, स्वदेस समिती व प्राईड इंडिया यांच्या सहाय्याने जिल्ह्यातील पहिला पथदर्शी प्रकल्प राबविला जात आहे. या प्रकल्पांतर्गत मागील आठवड्यात गावातील लोकांनी जमविलेले तब्बल ३०० किलो प्लास्टिक व २० किलो ग्लास वेस्ट पुनर्वापर (रिसायकल) करण्यासाठी मुंबई येथे पाठवण्यात आले आहे. या उपक्रमाद्वारे संपूर्ण गाव प्लास्टिकमुक्त होऊन पर्यावरणाचे संरक्षण आणि घनकचरा व्यवस्थापन उत्तम प्रकारे होणार आहे.

सरपंच उमेश यादव यांच्या संकल्पनेतून हा प्रकल्प साकार झाला. यासाठी ५आर मुंबई संस्था, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ, विद्यार्थी, शिक्षक, महिला ग्रामसंघ, महिला बचतगट व समाजसेवी संस्था यांचे महत्त्वपूर्ण योगदान व सहकार्य लाभले आहे. रायगडच्या पालकमंत्री आदिती तटकरे, आमदार रवींद्र पाटील, जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आदी मान्यवरांनी या प्रकल्पाला भेट देऊन या उपक्रमाचे कौतुक केले आहे. प्लास्टिक मुक्त ग्रामपंचायतीसाठी सिद्धेश्वर ग्रामपंचायतीने जे पाऊल उचलले आहे, ते संपूर्ण जिल्ह्यासाठी दिशादर्शक आणि आदर्शवत आहे, असे या मान्यवरांनी सांगितले.

या प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे सुधागड तालुक्यातील सिद्धेश्वर ग्रामपंचायत हद्दीतील सर्व गाव आणि वाड्या प्लास्टिक मुक्त होण्याकडे वाटचाल करीत आहेत. प्रकल्पाची अंमलबजावणी होण्यापूर्वी ५आर संस्थेच्या स्मिता बिरकर यांनी कोणते व कसे प्लास्टिक गोळा करायचे ते बाहेर फेकल्याने त्याचे पर्यावरण, वन्य व पाळीव जनावरांवर होणारे दुष्परिणाम याची माहिती दिली होती. शिवाय गोळा झालेले प्लास्टिक अधिकृत पुनर्प्रक्रियेसाठी घेऊन जाण्याविषयी ग्रामपंचायतीबरोबर नियोजन केले.




### सर्वांचा सहभाग

मागील सहा महिन्यांपासून ग्रामस्थ, ग्रामसंघ अध्यक्षा प्राची यादव, तसेच स्नेहा यादव आणि प्राची कदम यांच्यासह सर्व शिक्षक व विद्यार्थी, स्वदेश समित्या, प्राइड इंडिया प्रतिनिधी व ग्रामपंचायत टीमने केलेले प्रयत्न यामुळे तब्बल ३०० किलो प्लास्टिक व २० किलो ग्लास वेस्ट संकलन करून ते पुनर्वापरासाठी पाठवणे शक्य झाले. त्यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणातील प्लास्टिक गुराढोरांच्या पोटात जाण्यापासून वाचले, तसेच नदी-नाल्यांमध्येदेखील गेले नाही. यामुळे पर्यावरण संवर्धन व गाव आरोग्यदायी झाले.

### जबाबदारी उचलली


ग्रामपंचायतीने सर्व घरातील प्लास्टिक जमा करण्याची जबाबदारी सुकन्या ग्रामसंघ व त्यामध्ये समाविष्ट असलेल्या २० बचत गटांवर सोपवली आहे. ही जबाबदारी सामाजिक बांधिलकी समजून स्वीकारून पुढे योग्य पार पाडण्याची ग्वाही ग्रामसंघ अध्यक्षा प्राची यादव यांनी दिली. ग्रामपंचायत हद्दीतील चारही शाळांचे शिक्षक यांनी विद्यार्थ्यांना या उपक्रमात सहभागी करून घेतले. यामुळे सर्वांनी प्लास्टिक संकलनाची जबाबदारी उचलून प्रकल्पाचे उद्दिष्ट पूर्ण करण्याकडे वाटचाल केली. शिवाय राष्ट्रीय सण व सार्वजनिक कार्यक्रमावेळी गाव वाड्यांवर स्वच्छता अभियान राबवून देखील प्लास्टिक गोळा करण्यात आले. घनकचरा व्यवस्थापनासाठी नुकतेच गावागावात डस्टबीनदेखील वाटण्यात आले आहेत.

### असे केले संकलन

ग्रामस्थ, शिक्षक व विद्यार्थ्यांना प्लास्टिक कसे व कोणते गोळा करायचे याचे प्रशिक्षण देण्यात आले. त्यानंतर प्रत्येक घरात प्लास्टिक संकलन करण्यासाठी विशिष्ट पिशव्यांचे वाटप करण्यात आले. प्रत्येकाने सुक्या प्लास्टिक पिशव्या व प्लास्टिक बॉटल यामध्ये जमा केल्या, तसेच गावात संकलन केंद्र उभारण्यात आले. घराघरात जमा केलेले प्लास्टिक संकलन केंद्रावर आणण्यात आले आणि हे जमा केलेले प्लास्टिक ५आर संस्थेने मुंबई येथे रिसायकल करण्यासाठी नेले आहे. त्यामुळे ग्रामपंचायत हद्दीतील गाव व वाड्यावस्त्या प्लास्टिक मुक्त तर होणार आहेतच, त्याचबरोबर घनकचरा व्यवस्थापनदेखील होईल आणि आपोआपच पर्यावरण संवर्धन होत आहे.



## बदलते तंत्रज्ञान



### हे धोकादायक ॲप तुमच्या फोनमधून त्वरित करा डिलीट

तुम्ही गेल्या काही आठवड्यांमध्ये तुम्ही गुगल प्ले स्टोअरवरून अँड्रॉइड ॲप्स डाउनलोड केले असतील जे तुम्हाला मजेदार वाटले असतील. असे असले तरी तुम्ही सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. नुकतेच संशोधकांनी अँड्रॉइड ॲप्सची एक नवीन यादी जारी केली आहे, जी युजर्सचा डेटा आणि पैसे चोरण्यासाठी मॅलिशस टायटल वापरत आहेत. हे ॲप्स तुमच्या स्मार्टफोनमध्येही असतील तर ते लगेच डिलीट करा. यापैकी बहुतेक ॲप्स आधीच अधिकृतपणे प्ले स्टोअरवरून काढून टाकण्यात आले आहेत. फोन अरेनाने आपल्या अहवालात ही यादी जाहीर केली आहे.

**हे आहेत धोकादायक ॲप..**

डॉक्युमेंट मॅनेजर, कॉइन ट्रॅक लोन-ऑनलाइन लोन, कूल कॉलर स्क्रिन, पीएसडी ऑथ प्रोटेक्टर, आरजीबी इमोजी कीबोर्ड, कॅमेरा ट्रान्सलेटर प्रो, फास्ट पीडीएफ स्कॅनर, एआर बलून वॉलपेपर, कलरफुल मॅसेंजर, ठग फोटो एडिटर, ॲनिम वॉलपेपर, पीस एसएमएस, हॅपी फोटो कोलाज, ओरिजनल मॅसेंजर, पॅलेट मॅसेंजर, स्मार्ट की-बोर्ड, स्पेशल फोटो एडिटर, फोर के वॉलपेपर.


**मॅलिशस ॲप्स टाळण्याचे मार्ग**

अशा मॅलिशस ॲप्स आणि मालवेअरला तुमच्या अँड्रॉइड फोनमधून नेहमी बाहेर ठेवण्याचा कोणताही सरळ मार्ग नाही, परंतु जोखीम कमी करण्यासाठी तुम्ही काही टिप्स वापरू शकता... फक्त गुगल प्ले स्टोअरसारख्या विश्वसनीय स्त्रोतांकडून ॲप्स वापरून पहा आणि डाउनलोड करा.

सायबर सुरक्षा तज्ज्ञांनी सुचवलेले किंवा तुम्हाला अगदी कमी दुर्भावनायुक्त वाटतील, असे सर्व ॲप्स आपल्या मोबाइलमधून हटवा. ॲप डाउनलोड करण्यापूर्वी कृपया यूजर रेटिंग स्कोर आणि काही यूजर रिव्यू एकदा वाचा, आणि मगच ॲप डाउनलोड करा.

# वारकरी घराण्यातील क्रांतिकारी दामोदर चाफेकर

हरिभाऊ चापेकर या एका कीर्तनकारांच्या घरी २५ जून १८६९ रोजी दामोदर चाफेकर यांचा जन्म झाला. लहानपणापासूनच टिळकांच्या विचारांचा प्रभाव दामोदर यांच्यावर होता. २२ जून १८९७ रोजी पुण्यातील गणेशखिंडीत दामोदरपंतांनी आणि त्यांच्या सहकाऱ्या चार्ल्स रँड आणि आयर्स्टची हत्या केली. इंग्रजांनी दामोदरपंतांना १८ एप्रिल १८९८ रोजी पुण्यातील एरवडा तुरूंगात फाशी दिली. आज त्यांच्या जयंतीनिमित्ताने त्यांच्याविषयी थोडक्यात माहिती...



लहानपणापासूनच दामोदर चाफेकर यांना इंग्रजांकडून करण्यात येणाऱ्या अत्याचाराची मनस्वी चीड होती. दामोदरपंतांचे लहान भाऊ बाळकृष्ण चाफेकर व वासुदेव चाफेकर दोघेही त्यांच्या प्रत्येक कार्यात सहभागी होत होते. या तिन्ही भावांना 'चाफेकर बंधू' नावाने ओळखले जाते. हे तिन्ही भाऊ लोकमान्य टिळक यांच्या संपर्कात होते. टिळकांना ते गुरू मानत होते. त्यांचे वडिल हरिपंत हे पुणे व मुंबई येथे हरिकथा सांगायचे. बालवयात तिघेही भाऊ हरि कीर्तनात वडिलांना मदत करायचे. त्यामुळे चाफेकर बंधूंच्या शिक्षणात खंड पडला. विठ्ठलभक्ती करणाऱ्या या मराठी कुटूंबाने देशासाठी प्राणार्पण करणारे तीन तरणीबांड मुलेही दिली.

पुण्यामध्ये १८९७मध्ये प्लेगची साथ आली. प्लेगपीडित रुग्णांना शोधून उपचार करण्याच्या नावावर इंग्रजांनी पुण्यातील घराघरात शोधमोहीम उघडली आणि अत्याचाराचा हैदोस घातला. यामुळे इंग्रजांविरोधात असंतोष पसरू लागला. तत्कालीन जिल्हाधिकारी वाल्टर चार्ल्स रँड हा अत्यंत क्रूर, खुनशी होता. बाळ गंगाधर टिळक आणि आगरकर यांनी या अत्याचाराविरोधात टिका केली. यामुळे त्यांना जेलमध्ये टाकण्यात आले. दरम्यान, दामोदरपंतांनी रँडचा वध करण्याची योजना आखली. २२ जून १८९७ रोजी पुण्यातील गणेशखिंडीत रँड आणि त्याचा सहकारी लेफ्लिनंट आयस्टर यांची एका कार्यक्रमाहून परतत असताना गोळ्या झाडून हत्या केली.

गणेश आणि रामचंद्र या द्रविड बंधूंनी केलेल्या गद्दारीमुळे इंग्रजांना हल्लेखोरांची नावे कळाली आणि त्यांनी दामोदरपंतांना अटक केली. त्यानंतर काही दिवसातच बाळकृष्ण व वासुदेव चाफेकर तसेच महादेव रानडे या सर्वांनाच पकडण्यात आले. इंग्रजांनी दामोदरपंतांना १८ एप्रिल १८९८ रोजी पुण्यातील येरवडा तुरूंगात फाशी दिली. त्यानंतर वासुदेव चाफेकरांना ८ मे १८९९ रोजी तर बाळकृष्ण चाफेकरांना आणि महादेव रानड्यांना १० मे १८९९ रोजी फाशी देण्यात आली.

येरवडा तुरूंगात त्यांनी आपला जीवन प्रवास आणि क्रांतीकार्याचे तपशील नमूद करणारे १०० पानी आत्मवृत्त मोडीत लिहून काढले. ते वि. गो. खोबरेकर यांनी संपादित करून मराठीत आणले. १९७४ साली ते राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई या संस्थेने प्रकाशित केले.

-साभार divyamarathi.com

**क्लिक...क्लिक...!**





**मुरूड : पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनासाठी वारीतील दिघी, कुडगाव आणि मुरूडमधील ३०० वारकरी भोपळे दिंडी क्र. १४मध्ये सहभागी होतात. या दिंडीचे वैशिष्ट्य म्हणजे वारीत होणाऱ्या माऊलींच्या रिंगणात मानाचा घोडा जो सुवर्णध्वज घेऊन धावतो तो सुवर्णध्वज भोपळे दिंडीची आहे. हा मान रायगडवासीयांना पुरातन काळापासून देण्यात आला आहे.** (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर



### रात्री फळे खाण्याबाबत तज्ज्ञ म्हणतात...

शरीर पूर्णपणे निरोगी ठेवण्यासाठी तज्ज्ञ नियमित व्यायामासह नियंत्रित आणि निरोगी खाण्याची शिफारस करतात. केवळ अन्नातून शरीराला आवश्यक पोषक द्रव्ये मिळत नाहीत. त्यामुळे फळांचा आहारात समावेश करण्याचा सल्ला दिला जातो. तथापि फळे खाण्यासाठी कोणती वेळ सर्वोत्तम आहे, याबद्दल बरेच तर्क लावले गेले आहेत. रात्रीच्या वेळी फळे खाऊ नयेत, असे अनेकांचे म्हणणे आहे. प्रसिद्ध पोषणतज्ज्ञ मोहिता याविषयी सविस्तर सांगतात.

'रोज एक सफरचंद खाल्ल्यास डॉक्टरला दूर ठेवता येते' ही म्हण तुम्ही ऐकलीच असेल. म्हणजे रोज एक सफरचंद खाल्ल्याने तुम्हाला डॉक्टरकडे जायची गरज पडत नाही. अर्थात, तुम्ही निरोगी राहता. वास्तविक फळांमध्ये अनेक प्रकारचे पोषक घटक आढळतात, जसे की पोटॅशियम, फायबर, व्हिटॅमिन सी इत्यादी जे आपल्यासाठी खूप फायदेशीर आहेत.

फळे खाण्याबाबत अनेक संकल्पना आहेत, कोणते फळे कोणत्या वेळी खावे, रात्रीच्या वेळी फळे खाऊ नयेत, असे म्हणणारे अनेक लोक तुम्हाला आढळतील, मात्र रात्रीच्या वेळीही फळे खाण्यात काहीही नुकसान होत नाही, असे आहरतज्ज्ञ सांगतात. म्हणूनच रात्रीच्या वेळीही फळे खाण्यास संकोच करू नये.

मोहिता सांगतात की, फळे खाणे कोणत्याही वेळी आरोग्यासाठी फायदेशीर असले, तरी झोपण्याच्या किमान तीन तास आधी काहीही खाऊ नये. जेणेकरून तुम्हाला चांगली झोप लागेल. आहारतज्ज्ञ म्हणतात की, फळे आपल्या शरीराला अनेक पोषक तत्त्वे पुरवतात. यामुळे आपण रोज आपल्या शरीरानुसार फळांचे सेवन केले पाहिजे. मोसमी फळांचाही आस्वाद घ्यावा, कारण उन्हाळ्यात आपल्या शरीरात पाण्याची कमतरता भासू नये, म्हणून डॉक्टर नेहमी अशी फळे खाण्याचा सल्ला देतात, ज्यामध्ये पाण्याचे प्रमाण जास्त असते. रात्रीच्या वेळीही फळे खाण्यात काहीही नुकसान होत नाही. म्हणूनच रात्रीच्या वेळीही फळे खाण्यास संकोच करू नये, असेही त्या म्हणाल्या.

# आरोग्यसेवेतील मदतनीस मानधनापासून वंचित

## कर्जतच्या गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन



(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाच्या प्राथमिक आरोग्य केंद्र आणि आरोग्य उपकेंद्रमध्ये काम करणाऱ्या महिला मदतनीसांना मागील तीन महिन्यांपासून मानधन मिळत नाही. आपले थकीत मानधन मिळावे, अशी मागणी कर्जत तालुक्यातील महिला मदतनीसांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

रायगड जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाची सहा प्राथमिक आरोग्य केंद्रे कर्जत तालुक्यात आहेत. या आरोग्य केंद्रांच्या अंतर्गत ३३ आरोग्य उपकेंद्रे असून त्या ठिकाणी आरोग्य कर्मचाऱ्यांना मदत करण्यासाठी मानधन तत्वावर आरोग्य मदतनीस म्हणून स्थानिक महिलांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यांना प्रत्येकी महिना तीन हजार रुपये मानधन दिले जाते. या महिला मदतनीस शस्त्रक्रियेपासून लसीकरणापर्यंत सर्व कामांमध्ये आरोग्य कर्मचाऱ्यांना मदत करीत असतात.

र्जत तालुक्यातील नेरळ, कळंब, मोहिली, कडाव, आंबिवली आणि खांडस या सहा प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत २७ महिला मदतनीस कार्यरत आहेत. त्यांना कर्जत आरोग्य विभागाने मार्च २०२२ पासून मासिक मानधन दिलेले नाही. त्यामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या या महिला आरोग्य मदतनीसांच्या प्रतिनिधींनी कर्जतचे गटविकास अधिकारी तुकाराम साबळे यांची भेट घेऊन निवेदन दिले. त्यात थकीत मानधन मिळावे, अशी मागणी करण्यात आली आहे. या महिला आरोग्य मदतनीसांना शासनाकडून गणवेश आणि ओळखपत्रेही दिली गेलेली नाही.

कर्जत तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सी. के. मोरे तसेच महिला आरोग्य मदतनीस ज्योत्स्ना डावरे, कांचन मोरे, संगीता बांगारे, हिरा दुर्गे, ज्योती मते, रेणुका गंगावणे, यांच्यासह अन्य महिला उपस्थित होत्या.

**मार्च अखरेमुळे महिला आरोग्य मदतनीसांचे मानधन आलेले नाही. मात्र आम्ही तात्काळ रायगड जिल्हा परिषदेकडे नव्याने मागणीपत्र सादर केले आहे. या सर्व महिला आरोग्य मदतनीसांचे काम महत्त्वाचे असून मानधन न मिळाल्यामुळे त्यांच्या झालेल्या गैरसोयीबद्दल खेद आहे.**

**–चंद्रकांत साबळे, गटविकास अधिकारी, कर्जत**

## बुरूड समाजाचा उद्या अलिबागेत मेळावा

**अलिबाग : प्रतिनिधी**

तालुका बुरूड समाजाचा वार्षिक मेळावा रविवारी (दि. २६) अलिबाग येथील भाग्यलक्ष्मी मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती बुरूड समाज शाखा अध्यक्ष संजय मोरे यांनी दिली.

या मेळाव्यात रक्तदान शिबिर, ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार, विद्यार्थ्यांचा गुणगौरव, महिलांसाठी हळदी-कुंकू हे कार्यक्रम होणार आहेत. रविवारी सकाळी १० वाजता रक्तदान शिबिराचे उद्घाटन होईल. रायगड जिल्हा बुरूड समाज अध्यक्ष रुपेश जामकर, माजी जिल्हा अध्यक्ष राजेश मोरे, राजेश खैरे, बुरूड समाज महिला आघाडी अध्यक्षा सिध्दी मोरे यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांचा गुणगौरव व ज्येष्ठांचा सत्कार करण्यात येणार आहे.


### SRM E-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No. :- EE/EHV (O&M) /DIVN/MHD/Tech/ Tender-34/2022-23 Dtd. 24.06.2022 Rfx No. 7000023788** | **Sub :-** Invitation of SRM E-Tender for AMC of split AC units installed at EHV (O&M) Dn. office Mahad, 220 kV Kandalgaon,220 kV Vile Bhagad S/s , 100 kV Roha S/s & 100 kV Mhasala S/s under EHV O&M Dn. Mahad for the year 2022-23. | **Rs. up to 5,00,000/- (Including GST + 1% Labour CESS)** |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- plus GST + 1% Labour CESS.
Bid submission is from 24.06.2022 @ 00:00 hrs. to 03.07.2022 @ 23:59 Hrs. for above tender
For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No. 7373101089
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**(Mr. Pankaj H. Talele)**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn. Mahad**

### पाहिजेत

अल्पसंख्यांक विकास विभाग, महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक मलींचे वसतिगह, पनवेल साठी निव्वळ कंत्राटी पद्धतीने अत्यंत तात्पुरत्या स्वरूपात भरती करणेसाठी खालील पदांसाठी अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | पदनाम | संख्या | किमान पात्रता | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | अधिक्षक | १ | कोणत्याही शाखेचा पदवीधर व संगणक ज्ञान | महिला उमेदवार राखीव |
| २. | लिपिक | १ | दहावी पास टंकलेखन व संगणक ज्ञान आवश्यक | महिला उमेदवार राखीव |
| ३. | शिपाई | १ | किमान चौथी पास | महिला उमेदवार राखीव |
| ४. | सफाई कामगार | १ | किमान चौथी पास | महिला उमेदवार राखीव |
| ५. | वॉचमन | १ | किमान चौथी पास | – |

सदरहू पदांकरिता कंत्राटी पद्धतीने मानधन शासन निर्णय/वसतिगृह – २०१२/प्र.क्र.–१६८/का. ८ मंत्रालय मुंबई. २१/०६/२०१३ अन्वये राहील. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या (mdd.maharashtra.gov.in) वर उपलब्ध आहे. संपूर्ण अर्ज माहितीसह तसेच साक्षांकित प्रमाणपत्रासह स्वीकारण्याचा अंतिम दिनांक ३० जून २०२२ असून मुलाखतीसाठी शनिवार दि. ०२/०७/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहावे.

**पत्ता खालीलप्रमाणे**

शासकीय अल्पसंख्यांक मुलींचे वसतिगृह, प्राचार्य, शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल परिसर (Govt. B.Ed College), NH4, एस.टी. स्टँड जवळ, पनवेल.

**sd/-**
**CHAIRMAN**
**MInority Girl's Hostel**
**Principal Govt College Of Education Panvel (Govt Of Maharashtra)**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की मौजे. भोईरवाडी ता. कर्जत जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत सदर जमिन मिळकतीचे मालक/कब्जेदार श्री. फिरोझ फ्राम्रोझ कराका यांचेकडुन आमचे अशिलांनी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे. भोईरवाडी ता. कर्जत जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| स .नं. | हिस्सा नं | क्षेत्र. हे .आर . पॉ | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| १४ | ७ | ०-३०-२० | ०-२७ |
| १४ | ८ | ०-७२-७० | ०-६५ |
| १४ | ९/अ/१ | ०-३०-०० | ०-२९ |
| १४ | ९/अ/२ | ०-५८-०० | ०-४३ |
| २४ | १/अ | ०-४२-०० | ०-७४ |
| २४ | २ | ०-०६-०० | ०-०५ |
| २४ | ६ | ०-०४-०० | ०-०३ |
| २५ | १ | ०-४९-१० | ०-७२ |
| २५ | २ | ०-०९-०० | ०-०९ |
| २५ | ३ | ०-०६-६० | ०-१६ |
| २६ | १/अ | ०-८८-०० | १-०० |
| २६ | १/क | ०-५१-०० | ०-६२ |
| २६ | १/ब/१ | ०-३४-४० | ०-४० |
| २६ | १/ब/२ | ०-३२-३० | ०-३७ |
| २६ | १/ब/३ | ०-२८-३० | ०-३० |
| २६ | २ | ०-४१-०० | ०-५० |
| २६ | ३ | ०-१४-०० | ०-१२ |
| २६ | ४ | ०-२६-०० | ०-३१ |
| २७ | १/अ | ०-३९-३० | ०-७५ |
| २७ | १/क/१ | ०-२५-९० | २-४७ |
| २७ | १/क/२ | ०-६४-०० | १-०९ |
| २७ | १/ड | ०-२९-३० | २-०६ |
| २७ | १/ब | ०-०२-३० | ०-०३ |
| २७ | २ | ०-०३-०० | ०-०५ |
| २७ | ४ | ०-०२-५० | ०-०२ |
| ३० | १/अ/२ | ०-४१-०० | ३-२८ |
| ५० | १०/अ/२ | ०-१६-०० | ०-२५ |
| ५० | १४/अ/५ | १-१०-०० | १-२९ |
| ५० | १६ | ०-२३-०० | ०-३१ |

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही.

कर्जत
ता. २५/०६/२०२२
मो . न . ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे अॅडव्होकेट.
अॅड. समीर हरिश्चंद्र लाड.
शॉप नं. ५अ, वृंदावन कॉम्प्लेक्स,
मुद्रे, ता . कर्जत जि. रायगड

### –: जाहीर सूचना :–

सर्व हितसंबंधित व्यक्तींना कळविण्यात येते की, राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६चे रुंदीकरण करण्यासाठी महाड तालुक्यातील मौजे दासगाव, गांधारपाले व कसबे महाड या गावातील जमिनी संपादीत होत आहेत. त्याबाबत राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६चे कलम ३A अधिसूचना हिंदी व इंग्रजी मध्ये भारत राजपत्रात दिनांक १५/०६/२०२२ रोजी प्रसिद्ध झालेली आहे. या अधिसूचनेवर हरकती असल्यास अधिसूचना प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसाच्या आत सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी महाड विभाग महाड यांचे कार्यालयात दाखल कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

स्थळ :– महाड
दिनांक : २०/०६/२०२२

सही/–
(प्रतिमा पुदलवाड–शैगुलवार)
सक्षम प्राधिकारी
तथा उपविभागीय अधिकारी
महाड उपविभाग महाड

रजिस्ट्री सं. डी.एल.- 33004/99 | REGD. No. D. L.-33004/99

सत्यमेव जयते

**भारत का राजपत्र**
**The Gazette of India**

सी.जी.-डी.एल.-अ.-15062022-236599
CG-DL-E-15062022-236599

असाधारण
EXTRAORDINARY
भाग II—खण्ड 3—उप-खण्ड (ii)
PART II—Section 3—Sub-section (ii)
प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं. 2607] नई दिल्ली, बुधवार, जून 15, 2022/ज्येष्ठ 25, 1944
No. 2607] NEW DELHI, WEDNESDAY, JUNE 15, 2022/JYAISHTHA 25, 1944

**सड़क परिवहन और राजमार्ग मंत्रालय**
**अधिसूचना**
नई दिल्ली, 15 जून, 2022

**का.आ. 2739(अ).**—केन्द्रीय सरकार, राष्ट्रीय राजमार्ग अधिनियम 1956 (1956 का 48) (जिसे इसमें इसके पश्चात् उक्त अधिनियम कहा गया है) की धारा 3क की उप-धारा (1) द्वारा प्रदत्त शक्तियों का प्रयोग करते हुए, यह समाधान हो जाने के पश्चात् कि महाराष्ट्र राज्य के रायगड जिले में NH66 के कि.मी. 108.4 से कि.मी.148 (महद ) तक के भू-खण्ड के निर्माण (चौड़ीकरण/पेव्ड शोल्डर सहित 2-लेन/4-लेन का बनाना आदि), अनुरक्षण, प्रबन्धन और प्रचालन के लोक प्रयोजन के लिए वह भूमि अपेक्षित है जिसका संक्षिप्त वर्णन नीचे अनुसूची में दिया गया है, ऐसी भूमि का अर्जन करने के अपने आशय की घोषणा करती है।

कोई भी व्यक्ति, जो उक्त भूमि में हितबद्ध है, उक्त अधिनियम की धारा 3ग की उप-धारा (1) के अधीन पूर्वोक्त प्रयोजन के लिए ऐसी भूमि के उपयोग पर राजपत्र में इस अधिसूचना के प्रकाशन की तारीख से इक्कीस दिन के भीतर अपनी आपत्ति प्रकट कर सकेगा।

ऐसी प्रत्येक आपत्ति सक्षम प्राधिकारी, अर्थात् महद AND पोलादपुर को लिखित रूप में प्रस्तुत की जाएगी और उसमें उसके आधार अधिकथित किए जाएंगे और सक्षम प्राधिकारी, आपत्तिकर्ता को व्यक्तिगत रूप में या किसी विधिक पेशेवर द्वारा सुने जाने का अवसर देगा और ऐसी आपत्तियों की सुनवाई के पश्चात् तथा ऐसी और जाँच करने के पश्चात्, यदि कोई हो, जिसे सक्षम प्राधिकारी आवश्यक समझे, आदेश द्वारा या तो आपत्तियों को अनुज्ञात कर सकेगा या अननुज्ञात कर सकेगा।

उक्त अधिनियम की धारा 3ग की उप-धारा (2) के अधीन सक्षम प्राधिकारी द्वारा किया गया कोई भी आदेश अंतिम होगा।

इस अधिसूचना के अंतर्गत आने वाली भूमि के रेखांक और अन्य ब्यौरे सक्षम प्राधिकारी के उक्त कार्यालय में उपलब्ध हैं और उनका हितबद्ध व्यक्तियों द्वारा निरीक्षण किया जा सकता है।

**अनुसूची**

**महाराष्ट्र राज्य के रायगड जिले में NH66 के कि.मी. 108.4 से कि.मी.148 (महद ) के लिए अर्जन की जाने वाली संरचना रहित अथवा संरचना सहित भूमि का संक्षिप्त विवरण**

| राज्य का नाम: महाराष्ट्र | जिले का नाम: रायगड | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **क्रमिक संख्या** | **सर्वेक्षण संख्या** | **भूमि का प्रकार** | **भूमि की प्रकृति** | **भूमि का क्षेत्रफल (स्थानीय इकाई)** | **भूमि का क्षेत्रफल (हेक्टेयर)** |
| **तालुक का नाम: महाड** | | | | | |
| **गांव का नाम: दासगाव** | | | | | |
| 1 | 41/2B | निजी | नम | 0.0920000(हेक्टेयर) | 0.0920000 |
| **गांव का नाम: गांधारपाले** | | | | | |
| 1 | 104A/1C/3 | निजी | शुष्क | 0.0170000(हेक्टेयर) | 0.0170000 |
| **गांव का नाम: कसबे महाड** | | | | | |
| 1 | 32/1B | निजी | नम | 0.0135000(हेक्टेयर) | 0.0135000 |
| | | | कुल | **0.1225** | **0.1225** |

[फा. सं. RW/NH-37014/21/2013-NHDP-IV A/3A]
राजेश गुप्ता, निदेशक

**MINISTRY OF ROAD TRANSPORT AND HIGHWAYS**
**NOTIFICATION**
New Delhi, the 15th June, 2022

**S.O. 2739(E).**— In exercise of powers conferred by sub-section (1) of section 3A of the National Highways Act, 1956 (48 of 1956) (hereinafter referred to as the said Act), the Central Government, after being satisfied that for the public purpose, the land, the brief description of which is given in the Schedule below, is required for building (widening/two lane with paved shoulder/four laning etc.,), maintenance, management and operation of NH66 in the stretch of land from Km 108.4 to Km148 (SDO office Mahad) in the district of RAIGAD in the state of MAHARASHTRA, hereby declares its intention to acquire such land.

Any person interested in the said land may, within twenty-one days from the date of publication of this notification in the Official Gazette, object to the use of such land for the aforesaid purpose under sub-section(1) of section 3C of the said Act.

Every such objection shall be made to the Competent Authority, namely, SUB DIVISIONAL OFFICER MAHAD AND POLADPUR in writing and shall set out the grounds thereof and the Competent Authority shall give the objector an opportunity of being heard, either in person or by a legal practitioner, and may, after hearing all such objections and after making such further enquiry, if any, as the Competent Authority thinks necessary, by order, either allow or disallow the objections.

Any order made by the Competent Authority under sub-section (2) of section 3C of the said Act shall be final.

The land plans and other details of the land to be acquired under their notification are available and can be inspected by the interested person at the aforesaid office of the Competent Authority.

**SCHEDULE**

Brief Description of the land to be acquired with or without structures falling NH66 in the stretch of land from Km 108.4 to Km148 (SDO office Mahad) in the district of RAIGAD in the state of MAHARASHTRA

| State: MAHARASHTRA | District: RAIGAD | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **S. No.** | **Survey / Plot Number** | **Type of Land** | **Nature Of Land** | **Area (in Local Unit)** | **Area (in Hectare)** |
| **Taluk: Mahad** | | | | | |
| **Village: Dasgaon** | | | | | |
| 1 | 41/2B | Private | Wet | 0.0920000(Hectare ) | 0.0920000 |
| **Village: Gandharpale** | | | | | |
| 1 | 104A/1C/3 | Private | Dry | 0.0170000(Hectare ) | 0.0170000 |
| **Village: Kasabe Mahad** | | | | | |
| 1 | 32/1B | Private | Wet | 0.0135000(Hectare ) | 0.0135000 |
| | | | **Total** | 0.1225 | 0.1225 |

[F. No. RW/NH-37014/21/2013-NHDP-IV A/3A]
RAJESH GUPTA, Director

क्र. जिमाका/राअ/जाहि/६३/२०२२-२३

# जुन्या इमारतींची संरचना तपासणी

## नवी मुंबईत गृहसंकुलांकडून टाळाटाळ होत असल्याने पालिकेचा निर्णय

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नेरूळ येथील जम्मी पार्क इमारत दुर्घटनेनंतर पालिका प्रशासनाने आता शहरातील जुन्या ३० वर्षे पूर्ण झालेल्या इमारतींची संरचना तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. या इमारतींची संरचना तपासणी करावी, असे गृहसंकुलांना सांगूनही ती होत नसल्याने पालिकेने यासाठी पुढाकार घेतला असल्याचे नवी मुंबई महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी सांगितले.



(संग्रहित छायाचित्र)

### परीक्षणासंदर्भात आवाहन

*वर्षानुवर्षे महापालिका शहरातील इमारतींना संरचनात्मक परीक्षण करण्याचे आवाहन करत आहे, मात्र अनेक इमारती संरचनात्मक परीक्षण करण्याकडे दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे नवी मुंबई महापालिका सिडकोकडून स्वतः शहरातील ३० वर्षे जुन्या इमारतींची माहिती घेण्यात येणार असून त्यांची संरचनात्मक परीक्षण करून घेण्यात येणार आहे.*

दरवर्षी नवी मुंबई महापालिकेडून जुन्या इमारतींचे संरचनात्मक परीक्षण करून अहवाल सादर करण्याचे आवाहन करण्यात येते, मात्र याकडे काही गृहसंकुलांकडून पाठ फिरवली जाते. त्यामुळे पावसाळ्यात स्लॅब कोसळण्याच्या घटना घडत असतात. त्यामुळे सिडकोकडून शहरातील ३० वर्षे जुन्या इमारतींची माहिती पालिकेने मागितली आहे.

नवी मुंबईत सिडकोनिर्मित अनेक धोकादायक इमारतींचा पुनर्बांधणी प्रश्न वर्षानुवर्षे रेंगाळत आहे. वाशी, नेरूळ इत्यादी ठिकाणी ३० वर्षे जुन्या सिडकोनिर्मित इमारती आहेत, मात्र काही इमारतींचे आयुर्मान संपले असून मोडकळीस, जीर्ण झालेल्या आहेत. संक्रमण शिबिरांअभावी अनेक इमारतींचा पुनर्विकास रखडला आहे.

धोकादायक इमारतीत वास्तव्य करणे जिकिरीचे आहे, मात्र तरीदेखील त्यामध्ये धोकादायक इमारतींमध्ये नागरिक राहत आहेत.

# कमी दाबाच्या पाण्यामुळे नागरिक हैराण

## समस्या सोडवा; भाजपच्या सुनिता हांडे-पाटील यांची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिका प्रभाग १९ मध्ये कोपरखैरणे सेक्टर १४, १५, १६, २२, २३, १७ व अन्य परिसरात होत असलेल्या कमी दाबाच्या पाणीपुरवठ्यामुळे निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या समस्येचे तातडीने निवारण करावे, अशी मागणी कोपरखैराणे नोडमधील प्रभाग १९च्या भाजप पदाधिकारी सुनिता हांडे-पाटील यांनी महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्याकडे निवेदनातून केली आहे.

महापालिका प्रभाग १९ मध्ये कोपरखैरणे सेक्टर १४, १५, १६, २२, २३, १७ व अन्य परिसराचा समावेश होत आहे. या परिसरात गेल्या दोन-अडीच महिन्यांपासून महापालिका प्रशासनाकडून कमी दाबाने पाणीपुरवठा केला जात असल्याने स्थानिक रहिवाशांना कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे. या परिसरात सिडको वसाहती व एलआयजी परिसराचा, बैठ्या चाळींचा आणि रो-हाऊसेसचा समावेश होत असून येथील रहीवाशी अल्प, अत्यल्प व मध्य उत्पन्न गटातील आहेत. येथील प्रत्येक घरामध्ये लोकसंख्येचे प्रमाणही जास्त आहे. महापालिका प्रशासनाकडून कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने पालिका निर्मित पाणीटंचाईने रहिवाशी विशेषत: महिलावर्ग त्रस्त झाला आहे.

स्वमालकीचे मोरबे धरण असतानाही प्रभाग १९मधील रहिवाशांना गेल्या काही महिन्यापासून कमी दाबाने व कमी वेळेपुरताच पाणीपुरवठा होत असल्याने रहिवाशी त्रस्त झाले आहे आणि दररोज पाण्याचे टँकर मागविण्याइतपत येथील रहिवाशी श्रीमंत नाहीत. प्रभाग १९ मधील करदात्या रहिवाशांना महापालिका प्रशासन स्वमालकीचे मोरबे धरण असताना आणि धरणात पाणीसाठा असतानाही किमान पाण्याची गरज पालिका प्रशासन भागवू शकत नाही, ही प्रभाग १९ मधील रहिवाशांची शोकांतिका असल्याचे सुनिता हांडे-पाटील यांनी निवेदनात म्हटले आहे.

प्रभाग १९मधील स्थानिक रहिवाशांनी याबाबत आमच्या कार्यालयात तक्रारीही केल्या आहेत. रहिवाशांना पाणी पुरत नसल्याने ते त्रस्त झाले असून पालिका प्रशासनावर संताप व्यक्त करत आहेत. पालिका प्रशासनाच्या अडीच हजार कोटींच्या ठेवी आम्हाला भूषणावह नाही, तर किमान पाणी समस्या सोडवून माफक प्रमाणात पाणी मिळावे यासाठी आता स्थानिक रहिवाशांकडून टाहो फोडला जात आहे. पाणी वापराबद्दल नियमितपणे पाण्याचे देयक प्रशासनाकडे भरत असतानाही ही कमी दाबाच्या पाणीपुरवठ्यामुळे निर्माण होणाऱ्या पाणीटंचाईचा स्थानिक रहिवाशांनी काय अर्थ घ्यायचा? प्रभाग १९मधील रहिवाशांना उच्च दाबाने पाणीपुरवठा करून निर्माण होत असलेली पाणीटंचाई संपुष्ठात आणण्यासाठी संबंधितांना निर्देश देण्याची मागणी सुनिता हांडे-पाटील यांनी महापालिका प्रशासनाकडे केली आहे.



# भाजपच्या सतीश निकमांकडे लोकसभा तयारीची जबाबदारी

**नवी मुंबई : बातमीदार**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या संदर्भात केंद्रीय भाजपने तीन महत्त्वाच्या मोहिमा सुरू केल्या आहेत. बूथ शक्तीकरण अभियान, लोकसभा प्रवास योजना आणि डेटा व्यवस्थापन अशा या तीन मोहिमा आहेत. या सर्व मोहिमांमध्ये नवी मुंबईतील भाजपचे पदाधिकारी सतीश निकम यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे.

पालघर, कल्याण, दक्षिण मुंबई आणि दक्षिण मध्य मुंबई या चार प्रमुख मतदारसंघांमध्ये निकम विशेष लक्ष घालण्यास सांगितले आहे. निवडणुकीची तयारी लोकसभा आणि केंद्राच्या योजनांसह काही मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी भाजपच्या वरिष्ठ नेत्यांची प्रदेश कार्यालयात बैठक झाली. या बैठकीला विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील, राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे आदी उपस्थित होते.

भाजपने आता २०२४ च्या लोकसभा निवडणुकीची तयारी सुरू केली असून राज्यात ४५ जागा जिंकण्याचे लक्ष्य ठेवले आहे. राज्यातील ३८ मतदारसंघांवर अधिक लक्ष दिले जाणार आहे ज्यात शिवसेनेने निवडणूक लढवली असून भाजपचे संख्याबळ कमी आहे, त्यापैकी १६ लोकसभा मतदारसंघांसाठी भाजपने प्रभारी नियुक्त केले आहेत.

# आणीबाणीचे दिवस...

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात स्वातंत्र्यकाळातील आणीबाणीचे काळे दिवस आठवले की, स्वातंत्र्याची महती अधिकच मनावर ठसते. या काळ्या दिवसांतील ज्येष्ठ भाजप नेते राम नाईक यांच्या आठवणी..

भारतीय जनता पार्टी आज देशातलाच नव्हे; तर जगातला सर्वांत मोठा राजकीय पक्ष आहे. केंद्र सरकाराबरोबरच देशातील १८ राज्यांमध्ये आजमितीस भारतीय जनता पार्टी स्वतःच्या ताकदीवर किंवा मित्र पक्षांच्या सहकार्याने सत्तेत आहे. अशा पक्षाचा ज्येष्ठ नेता म्हणून जेव्हा लोकं मला संबोधतात तेव्हा कृतार्थ वाटतं, पण त्याचवेळी पक्षाची इथवर प्रगती करण्यासाठी कोणकोणते काटेरी मार्ग पादाक्रांत केले त्याचेही स्मरण होते.

२५ जून म्हटलं की अशा अनेक आठवणींचे मोहोळच मनात उठते. २५ जून १९७५मध्ये भारतीय जनता पार्टी अस्तित्त्वातच नव्हती. भाजपाची मुळे असलेल्या भारतीय जनसंघाचे ते दिवस होते. जनसंघाचे निवडणूक चिन्ह होते पणती! तेव्हा मुंबईत जनसंघाची ती पणती घरोघरी पोहचावी यासाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्यांची एक मोठी फळीच तयार झाली होती. डॉ. वसंतकुमार पंडित, सर्वश्री झमटमल वाधवानी, वेदप्रकाश गोयल, बाळासाहेब कानिटकर, वामनराव परब, बबनराव कुलकर्णी, नानूभाई पटेल, विनोद गुप्ता, जयवंतीबेन महेता, मालतीबाई नरवणे असे आम्ही एकदिलाने काम करीत होतो. मी जनसंघाचा मुंबईतील संघटन मंत्री होतो. देशाच्या राजकीय पटलावर त्या वेळी इंदिरा गांधींची हुकुमत होती. त्यांनी हातची सत्ता सोडायची नाही म्हणून २५ जून १९७५च्या रात्री आणीबाणी घोषित केली. पाठोपाठ काँग्रेसच्या विरोधातील विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना यांच्या कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणावर धरपकड झाली. त्याला जनसंघाचे मुंबईतले कार्यकर्ते ही अपवाद नव्हते. संघटनेत मी ज्यांच्याकडे ज्येष्ठ म्हणून बघे, ज्यांच्या सल्ल्याने काम करीत असे अशा सर्व मंडळींची तुरुंगात रवानगी झाली होती. मुंबईतील पदाधिकाऱ्यांपैकी दैनंदिन पातळीवर काम करणारे आम्ही दोघेच, मी व बबनराव कुलकर्णी (पत्रकार वैजयंती कुलकर्णी-आपटे यांचे वडील) अटक न होता बाहेर होतो. आम्ही मुंबईतील महत्त्वाचे जनसंघाचे पदाधिकारी, पण तुलनेने सौम्य स्वभावाचे. वामनराव परब, रामदास नायक, प्रेमकुमार शर्मा हे हल्लीच्या भाषेत 'फायरब्रॅण्ड'. सरसकट धरपकड नाही हे दाखविण्यासाठी बहुधा ही मवाळ मंडळी काय करतील या विचाराने आम्हाला मोकळे ठेवले असावे, पण सौम्य स्वभावाची माणसंही किती कणखर असतात हे दाखवून द्यायची जिद्द आमच्यात होती.

राजकीय कार्यकर्त्यांना आणीबाणीच्या काळ्या दिवसांचा किती त्रास झाला याच्या अनेक कथा सर्वांना माहीत आहेत. तपशीलात थोडाफार बदल केला, तर सर्वांचे हाल सारखेच होते. माझ्यावर व बबनरावांवर मुंबई जनसंघाची संपूर्ण जबाबदारी होती. मुंबईचा संघटन मंत्री असल्यामुळे आणीबाणीत मला सर्व आघाड्यांवर लढावे लागत होते. सगळ्यात पहिले काम म्हणजे मुंबईत सत्याग्रहांचे नियोजन, दुसरे महत्त्वाचे काम म्हणजे धरपकड झालेले आमचे नेते, कार्यकर्ते यांच्या कुटुंबीयांशी समन्वय, कुटुंबीयांच्या तुरुंगातील भेटी योजण्यापासून त्यांना दैनंदिन जीवनात होणारा त्रास कमी करण्याचे प्रयत्न करण्यापर्यंत सर्व सहयोग द्यायचा. या कामामुळेच अनेकांच्या कुटुंबीयांशीही माझे भावबंध जुळले. तिसरे महत्त्वाचे काम म्हणजे जनसंघाचे व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे उच्चपदस्थ भूमिगत नेते जेव्हा मुंबईत येत तेव्हा त्यांची व्यवस्था, निरोपानिरोपी याकडे लक्ष देणे. चौथे माझ्या आवडीचे, पण अत्यंत जोखमीचे काम म्हणजे आणीबाणीविरुद्ध जनमत तयार करण्यासाठी तसेच आंदोलनांसाठी गुप्तपणे पत्रके काढणे, त्यांचे वाटप करणे आणि सर्वांत महत्त्वाचे पाचवे काम म्हणजे आणीबाणीविरुद्ध संघर्षासाठी उभे ठाकलेले अन्य राजकीय पक्ष-समाजवादी पक्ष, संघटना काँग्रेस, कम्युनिस्ट पार्टी तसेच सर्वोदय मंडळ व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्या मुंबईतील मंडळींशी समन्वय साधून आंदोलन मजबूत करणे.

### निवडणुकीची रणनीती

नुकत्याच पार पडलेल्या राज्यसभा आणि विधान परिषद निवडणुकांची रणनीती कौशल्याने आखल्याबद्दल माझ्या तरुण सहकाऱ्यांची, विशेषतः देवेंद्र फडणवीस आदींची सध्या सर्वत्र वाहव्वा होते आहे. त्या पार्श्वभूमीवर आणीबाणीत विधान परिषदेवर मुंबई पदवीधर मतदारसंघातून भारतीय जनसंघाच्या दोन्ही उमेदवारांना विजयश्री मिळावी यासाठी मी माझे सर्व संघटन कौशल्य पणास लावले होते. ते दिवस आठवले. आमचे दोन्ही उमेदवार डॉ. वसंतकुमार पंडित व प्रा. ग. भा. कानिटकर त्यावेळी तुरुंगात होते. तरीही त्यांचा विजय झाला. या दोन्ही जागा पहिल्या फेरीतच ७० टक्क्यांपेक्षा जास्त मते घेऊन आम्ही जिंकल्या. त्यासाठी केलेल्या कष्टांचे चीज झाले. या निवडणुकीची आठवण झाली की मी मानाचा मुजरा करतो तो आमच्या गोरेगावच्या श्रीमती शरयू कोल्हटकर यांना! त्यांचे पती व त्या वेळचे गोरेगाव जनसंघाचे उपाध्यक्ष स. के. कोल्हटकर यांचे मतदानाच्या आदल्या दिवशी हृदयविकाराच्या झटक्याने आकस्मिक निधन झाले. दुःखाचा पहाड कोसळला असतानाही आणीबाणीचा निषेध म्हणून कोल्हटकर वहिनींनी दुसऱ्या दिवशी जाऊन मतदान केले. सामन्यांच्यात दडलेलं असामान्यत्व आणीबाणीच्या काळोखात असं उजळून निघालं. या निकालामुळे मुंबईतील सुशिक्षित पदवीधर आणीबाणीच्याविरोधात असल्याचे सिद्ध झाले.

### आकस्मिक आघातातही लढा सुरू...

निवडणुकीच्या निमित्ताने माझे काम अन्य राजकीय पक्षांच्याही नजरेत आले. मला जवळून ओळखणारे माझे एक सहकारी तर मला आजही प्रेमाने ऐकवतात की आणीबाणी त्रासाची खरी, पण त्या सर्व आव्हानांतूनच तुमचं नेतृत्व फुललं, तुमचे गुण लक्षात यायला. त्यांचा उपयोग व्हायला एरवी कदाचित बराच काळ जावा लागला असता, पण मुंबई जनसंघात तुमचा एकखांबी तंबू झाल्याने पुढे येऊन तुम्ही जे काम केलं त्यामुळे तुमचे गुण अल्पावधीतच कळले. काही अंशी मीही त्यांच्याशी सहमत आहे.



**आणीबाणीनंतरच्या निवडणुकीपूर्वी जनजागृतीसाठी घेतलेल्या सभेत बोलताना चंद्रशेखर व मंचावर डावीकडून सर्वश्री राम नाईक, बबनराव ढाकणे, मधु दंडवते, एस. एम. जोशी, शांती पटेल, प्रमिला दंडवते आदी.**

मी आणि बबनराव कुलकर्णी दोघे अटक न होता बाहेर असताना नियतीच्या दणक्याने माझा एकखांबी तंबू झाला. आणीबाणीविरुद्ध मुंबईतील लढ्याच्या आयोजनाच्या कठीण जबाबदारीमुळे आमच्या दोघांतली मैत्री आणखीच घट्ट झाली होती. एके दिवशी आणीबाणीविरोधात काढावयाच्या दोन पत्रकांचे मसुदे आम्ही तयार केले. ते व अन्य काही सामग्री बबनराव दुसऱ्या दिवशी छपाईसाठी देणार होते. कामे आटोपून दादर स्थानकावर आम्ही एकमेकांचा निरोप घेतला. मी स्कूटरवरून गोरेगावला आलो, तर बबनराव मध्य रेल्वेने मुलुंडला रवाना झाले. घरी येऊन हातपाय धुतो न् धुतो तोच फोन आला. बबनरावांना गाडीतच हृदयविकाराचा तीव्र झटका आला होता. सहप्रवाशांनी त्यांना इस्पितळात नेले होते, परंतु ते वाचले नाहीत. अतीव दुःख झाले. त्यातच मनात पुढचे विचार आले आणि पायाखालची जमीनच सरकली. बबनरावांच्या बॅगेत आमचे साहित्य व छापखान्याचा तपशील आणि आणीबाणीसंदर्भातील अनेक कागदपत्रे होती. सारेच गोपनीय. मामला रेल्वेत निधनाचा म्हणजे पोलीस हजर झालेच असणार. मी तिथे पोहचण्यापूर्वीच सारे साहित्य पोलिसांच्या हाती लागले, तर आंदोलनाला मोठीच खीळ बसणार. त्याही परिस्थितीत मनावर ताबा ठेवून बबनरावांचे शेजारी व आमचे मित्र आकाशवाणीतील वृत्तनिवेदक शरद चव्हाण यांना फोनवर गाठले. तुम्ही गुपचूप बॅग ताब्यात घेता येते का बघा, अशी गळ घातली. सरकारी नोकरीत असूनही शरद चव्हाणांनी त्याच प्रकारची बॅग झपाट्याने शोधली आणि ती घेऊन ते तडक रुग्णालयात गेले. अतिशय चलाखीने बॅग बदलून बबनरावांची बॅग घेऊन ते परतले. मित्राच्या निधनाचे दुःख बाजूला ठेवून देशहिताचे काम आधी करायचा धडा आणीबाणीविरुद्ध लढताना आम्हाला मिळाला. आजही आणीबाणीचे दिवस म्हटले की या दोन्ही सहकाऱ्यांची मला हमखास आठवण येतेच.

### पक्षातीत मित्रता


बबनरावांसारखा जिवलग मित्र आणीबाणीत मी गमावला. तथापि. याच आणीबाणीमुळे अन्य राजकीय पक्षांचे मुंबईतील बिनीचे शिलेदार - संघटना काँग्रेसचे प्राणलाल व्होरा व प्रद्युम्न बधेका, सर्वोदय मंडळाचे गोविंदराव देशपांडे, समाजवादी पक्षाचे प्रभुभाई संघवी, आदींशी मित्रत्वाचे नाते जडले ते कायमचे. आणीबाणीत सर्वांशी समन्वय साधत केलेल्या कामाचा परिणाम म्हणजे आणीबाणी उठल्यावर मुंबईतील लोकसभेच्या सर्वच्या सर्व सहा जागांवर जनता पार्टीचे उमेदवार विजयी झाले. अर्थात जनता पार्टीची औपचारिक स्थापना या लोकसभा निवडणुकीनंतर झाली. जनता पार्टी स्थापन झाल्यानंतर जनता पार्टी, मुंबईच्या अध्यक्षपदाची निवडणूक मतदान घेऊन झाली आणि त्यात मी विजयी झालो याचे कारण जनसंघाव्यतिरिक्त जनता पार्टीत सहभागी झालेल्या अन्य पक्षांच्या मंडळींनीही माझं आणीबाणीतील काम पाहून डॉ. शांती पटेलांनी पुरस्कृत केलेल्या मुकुंदराव भुजबळ पाटील यांच्याऐवजी मला पसंत केलं.

### थोरा-मोठ्यांचे थेट मार्गदर्शन

आणीबाणीच्या न भूतो न भविष्यति अशा परिस्थितीमुळे जनसंघाच्याच नव्हे; तर इतरही अनेक मोठ्या नेत्यांशी माझा थेट संबंध आला. माझे राजकीय व्यक्तिमत्त्व संपन्न होण्यास त्याची मोठीच मदत झाली. आणीबाणीमुळेच रा. स्व. संघाचे भाऊराव देवरस (सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांचे वडील बंधू), नानाजी देशमुख, श्री दत्तोपंत ठेंगडी, मोरोपंत पिंगळे आदी मंडळींना वारंवार भेटता आले. त्यांचे मार्गदर्शन मिळाले. आणीबाणीमुळेच एस. एम. जोशी यांचे सान्निध्यही लाभले; अन्यथा वेगळ्या विचारसरणीच्या नेत्याशी एरवी एवढ्या जवळून कोठला परिचय व्हायला? याच काळात प्रकृती अस्वास्थ्यामुळे जयप्रकाश नारायण यांना जसलोक रुग्णालयात दीर्घकाळ दाखल केले गेले. त्यामुळे त्यांच्या भेटीला देशाभरांतून येणाऱ्या अनेक मोठ्या नेत्यांच्या गाठीभेटी झाल्या. अनेकांना ते भूमिगत असल्याने पोलीस पहारे चुकवत जयप्रकाश नारायणांचे दर्शन घडविले. गनिमी लढायांच्या त्या आधुनिक पद्धती होत्या. भूमिगत नेत्यांनी अनेकदा अचानक वेगवेगळ्या रूपात येऊन आम्हालाही चकविले. नानाजी देशमुखांसारखा धीरगंभीर ज्येष्ठ नेता सुटाबुटात समोर येऊन बोलू लागला तरी आमच्या लक्षात न आल्यामुळे आम्ही कसे कसनुसे झालो ते आठवून आजही हसू येते. त्यात नानाजींची भूमिगत राहायची व्यवस्था आम्हीच गोरेगावात केली होती. समोरच्याला चकवायचे कसे ते असे शिकलो.

### आणीबाणीला सर्वांचाच विरोध

आणीबाणी संपविणे भाग पडावे म्हणून एकाचवेळी देशभर वेगवेगळ्या ठिकाणी सत्याग्रह करण्यात यश मिळत होते. मुस्कटदाबीला न जुमानता बोलण्याचे धैर्य दाखवावे अशी इच्छा, धाडस जनसामान्यांत निर्माण करण्यात आम्ही यशस्वी होत होतो. आणीबाणीविरुद्धचे जनमत सर्व स्तरांतील लोकांत जागृत करायचे होते. त्यामुळे वेगवेगळ्या क्षेत्रांतील तज्ज्ञांशी जवळून संपर्क साधला. त्यामुळेही माझ्या व्यक्तिमत्त्वाचाही विकास झाला. राजकीय कार्यकर्त्याप्रमाणेच वृत्तपत्रांचीही मुस्कटदाबी होत होती. वृत्तपत्र स्वातंत्र्यावरही गदा आली होती. मग पत्रकारांनाही एकत्र करून त्यांनी सत्याग्रह करण्याचे ठरले. 'महाराष्ट्र टाइम्स'चे दि. वि. गोखले, 'मिड-डे'चे अरविंद कुलकर्णी, 'इंडियन एक्स्प्रेस'चे नीळकंठ देशमुख यांच्याशी व्यावसायिक सीमांपलिकडे जाऊन मैत्री जुळली. समाजातील सर्वच स्तरांचा आणीबाणीला विरोध होता. एरवी जाहीरपणे भाष्य न करणारा वर्ग म्हणजे न्यायसंस्था, पण आम्ही अनेक ज्येष्ठ न्यायाधीश मंडळींनाही बोलते व्यायचे आवाहन केले. न्यायमूर्ती एम. सी. छगला, न्या. तारकुंडे यांसारख्या ज्येष्ठ मंडळींच्या सभा आम्ही आयोजित केल्या. त्यांनीही प्रेरणादायी भाषणे केली.



विशेष

राम नाईक
माजी राज्यपाल, उत्तर प्रदेश

### आणीबाणीतली दिवाळी

आणीबाणीत दिवाळीपूर्वी मोठ्या प्रमाणात अटकसत्र सुरू होण्याची पूर्वसूचना माझ्या पोलीस अधिकारी मित्राने दिली होती. मी मुंबईबाहेर जाणे हा त्यावर उपाय होता. तो अंमलात आणणार असल्याचे तुरुंगातील सहकाऱ्यांच्याही कानावर जाईल अशी व्यवस्था केली. लगोलग मला आमचे त्या वेळचे महाराष्ट्र जनसंघाचे अध्यक्ष डॉ. वसंत कुमार पंडित यांचा तुरुंगातून निरोप आला. तुरुंगात नसतानाही कुटुंबीयांशिवाय दिवाळीत राहू नकोस. माथेरानला माझा बंगला रिकामा आहे. तिथे तुम्ही चौघे दिवाळीत जाऊन रहा, असा आदेशच त्यांनी दिला. दोन खणी घरात राहणाऱ्या माझ्या दोन्ही शाळकरी मुलींना मुंबईबाहेर तेही मोठ्या बंगल्यात फक्त आई-बाबांसोबत दिवाळी साजरी करताना अवर्णनीय आनंद झाला होता. आजही ती त्यांच्या आठवणीतील अत्यंत लाडकी दिवाळी आहे.

### लक्षावधींना तुरुंगवास

देशभरातून आणीबाणीचा होत असलेला विरोध चिरडण्याचे बरेच प्रयत्न झाले, पण अखेर आणीबाणी उठवणे इंदिरा गांधींना भाग पडले. त्यानंतर देशावर कोणतीच संकटे कधी आली नाहीत असे नाही, पण आज देशाच्या स्वातंत्र्याला अमृत महोत्सव साजरा करीत असताना मला वाटतं स्वातंत्र्योत्तर काळातील सर्वांत काळा कालखंड म्हणजे आणीबाणीचे १९ महिने! या १९ महिन्यांमध्ये देशातील थोडेथोडके नव्हे; तर १,१०,००० जण अटकेत होते. विविध राजकीय पक्ष, संघटना यांच्या सामान्य कार्यकर्त्यापासून अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण आडवाणी यांसारख्या अनेकानेक शीर्षस्थ नेत्यांचा यात समावेश होता. त्याखेरीज आणीबाणीविरुद्ध सत्याग्रह केला, किंबहुना करण्याचा प्रयत्न केला म्हणून काही काळासाठी तुरुंगवास भोगलेल्यांची तर नेमकी गिणतीच उपलब्ध नाही. ती संख्याही अशीच मोठी होती. या सर्व धरपकडींमुळे सामान्य जनता सतत चिंतेत, तणावग्रस्त असे. महागाई, सक्तीची नाकाबंदी अशा अनेक संकटांचा तोंड दाबून सामना करताना जनता पिचून जात होती. या जुलमी राजवटीला कंटाळली होती. सरकारच्या गुप्तचर विभागालाही जुलमी राजवट नकोशी वाटून त्यांनी चुकीचा अहवाल दिला किंवा काय हे ईश्वर जाणे, परंतु गुप्तचर विभागाने निवडणुका घेतल्या तरी पुन्हा तुमचंच राज्य येईल अशी ग्वाही इंदिरा गांधी यांना दिली. त्यामुळे निवडणुका घेण्याचा निर्णय श्रीमती गांधी यांनी घेतला. त्यांच्या कार्यपद्धतीनुसार अचानक आणीबाणी रद्द झाली. दिग्गज नेते-कार्यकर्ते साऱ्यांची मुक्तता झाली. आणीबाणीविरुद्धच्या आंदोलनात सर्व विरोधी राजकीय पक्ष एकत्र आले होते. आम्ही निवडणुकाही एकत्र लढलो. आणीबाणीच्या विरोधात जनमत असल्याने इंदिरा गांधी यांचा दणदणीत पराभव झाला. स्वतंत्र भारताच्या इतिहासातील एका काळ्या कालखंडावर पडदा पडला. आणीबाणी जवळून पाहिलेली पिढीही आता हळूहळू काळाच्या पडद्याआड जाईल. आज स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात या आठवणींना उजाळा देण्यामागे एकच हेतू आहे तो म्हणजे स्वातंत्र्यासाठी परकियांशी आणि प्रसंगी स्वकियांशीही लढावे लागते आणि अंतिमतः विजय स्वातंत्र्यासाठी निर्धाराने लढणाऱ्यांचाच होतो हे त्रिकालाबाधित सत्य नव्या पिढीला उमजावे. या देशात पुन्हा अशी परिस्थिती उद्भवू नये यासाठी योग्य सरकार निवडणे गरजेचे आहे हेही यानिमित्ताने अधोरेखित करावेसे वाटते.

# रायगडात २४ तासांत कोरोनाचे ३१७ नवीन रुग्ण

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात शुक्रवारी (दि. २४) संपलेल्या २४ तासांमध्ये ३१७ व्यक्ती कोरोना पॉझिटिव्ह आढळून आल्या. जिल्ह्यातील कोरोना रुग्णांची एकूण संख्या हजारांच्यावर गेली आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासन आणि आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे.

जिल्ह्यात पुन्हा एकदा कोरोना रुग्णसंख्येत मोठी वाढ होताना दिसते आहे. सध्या एकूण एक हजार ९७ ॲक्टिव्ह रुग्ण आहेत. त्यापैकी १३ रुग्ण कोविड रुग्णालयात उपचार घेत आहेत.

वाढत्या रुग्णसंख्येच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी रायगड जिल्ह्यातील नागरिकांना सतर्क व सजग राहण्याचे तसेच स्वतः ची काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे यांनी रायगड जिल्ह्यातील सर्व नागरिकांना स्वतः ची व इतरांची काळजी घावी तसेच कोविड-१९ नियमांचे काटेकोरपणे पालन करावे असे आवाहन केले आहे. तसेच सर्व नागरिकांनी सामाजिक अंतर, मास्कचा वापर आणि सॅनिटाझरचा वापर या त्रिसुत्रीचा अवलंब करण्याबाबत सूचना दिल्या आहेत.


(संग्रहित छायाचित्र)

नागरिकांनी कोरोनापासून आपला बचाव करण्यासाठी कोविड लसीकरणाचे दोन्ही डोस पूर्ण करावेत, असेही जिल्हा प्रशासनाकडून आवाहन करण्यात येत आहे. तसेच १५ ते १८ वर्ष वयोगटातील मुलांनी लसीकरणाचे दोन्ही डोस घ्यायचे आहेत व इतर नागरिकांनी म्हणजेच १८ वर्ष व त्यावरील नागरिकांनी कोविशिल्ड किंवा कोव्हॅक्सिनचे दोन डोस पूर्ण करून घ्यावेत, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

तसेच ६० वर्ष व त्यावरील सहव्याधी असलेल्या नागरिकांनी त्यांचा दुसरा डोस पूर्ण झाल्यानंतर नऊ महिने किंवा ३९ आठवडे पूर्ण झालेले असल्यास व त्यांना तीन महिन्यामध्ये कोविड संसर्ग झालेला नसल्यास त्यांनी प्रिकॉशनरी (बुस्टर) डोस पूर्ण करून घ्यावा. त्याचबरोबर १८ ते ५९ वर्षातील नागरिकांनी प्रिकॉशनरी (बुस्टर) डोस घेण्याचा असल्यास व दुसरा डोस घेऊन नऊ महिने झाले असल्यास त्यांनी खाजगी लसीकरण केंद्रावर जाऊन त्यांचे डोस पूर्ण करून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## खोपोली पोलिसांनी आवळल्या मोबाइल चोरांच्या मुसक्या

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

शहरात गुरुवारी (दि. २३) भरलेल्या आठवडा बाजारात तब्बल तीन मोबाइल चोरीच्या घटना घडल्या. त्याच्या तक्रारी येताच खोपोली पोलीस ॲक्शन मोडमध्ये आले. त्यांनी रातोरात दोन मोबाइल चोरांच्या मुसक्या आवळल्या.

खोपोलीत दर गुरुवारी आठवडा बाजार भरतो. या बाजारातील गर्दीचा फायदा घेत भुरटे चोर छोट्या-मोठ्या प्रमाणात चोऱ्या करतात. गुरुवारी दुपारी रेल्वे स्थानक रस्त्यावर एकाचा मोबाइल चोरीला गेला. त्याने खोपोली पोलीस ठाण्यात तक्रार दिली. संध्याकाळपर्यंत मोबाइल चोरीच्या तीन तीन तक्रारी दाखल झाल्याने वरिष्ठ निरीक्षक शिरीष पवार यांच्या मार्गदर्शनाखालील पोलीस पथकाने सीसीटिव्ही तपासले, त्यातील फुटेजच्या आधारे चोरट्यांची छायाचित्रे काढण्यात आली व चोराचा शोध सुरू झाला. दोन मोबाइल चोरांना ताब्यात घेण्यात आले. ते मूळचे मध्यप्रदेशातील असून सध्या पनवेल रेल्वे स्थानक परिसरातील झोपडपट्टीमध्ये रहात आहेत. त्यांच्याकडे चोरलेले मोबाइल मिळून आले. या चोरट्यांकडून आणखी काही चोरीच्या घटना उघड होतील, असा विश्वास खोपोली पोलिसांकडून व्यक्त होत आहे.

## निष्काळजीपणे गाडी चालविणाऱ्या चालकास शिक्षा

**खालापूर : प्रतिनिधी**

रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून निष्काळजीपणे गाडी चालवून फिर्यादीस गंभीर दुखापत केल्याप्रकरणी आरोपी रणजित बाळू सरवदे याला खालापूर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी पी. एम. माने यांनी न्यायालय न्यायासनावरून उठेपर्यंत साधा कारावास आणि पाच हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली.

**खालापूर न्यायालयाचा निकाल**

यातील आरोपी रणजित सरवदे याने त्याच्या ताब्यातील टँकर खालापूर टोलनाक्याकडून खालापूर-पेण रोडकडे अतिवेगात, हयगयीने, बेदरकारपणे, रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करून चालवून ३१ जुलै २०१८ रोजी दुपारी ३.३० वाजता फिर्यादी यांच्या स्कुटीला धडक दिली. त्यामुळे फिर्यादीस गंभीर स्वरूपाच्या दुखापती झाल्या व स्कूटीचे नुकसान केले. याबाबत खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती. तपासीक अंमलदार ए. बी. सावंत यांनी या गुन्ह्याचा करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते.

या खटल्याची सूनावणी खालापूर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात झाली. सरकार पक्षातर्फे एकूण चार साक्षीदारांच्या साक्ष नोंदवून युक्तीवाद सादर करण्यात आला होता. न्यायालयाने आरोपी रणजित सरवदे याला दोषी ठरवून भादंविक २७९, ३३७, ३३८ अन्वये न्यायालय न्यायासनावरून उठेपर्यंत साधा कारावास व पाच हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली.अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील ॲड. कल्पना फोंडके यांनी काम पाहिले. त्यांना न्यायालयातील पोलीस कर्मचारी पैरवी अधिकारी ए. एन. तडवी (पोलीस हवादार) यांनी सहकार्य केले.

## कर्जत पालिका कार्यालयात आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष

**कर्जत : प्रतिनिधी**

पावसाळ्यातील संभाव्य नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्याच्या दृष्टीने कर्जत नगर परिषद कार्यालयात आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आला आहे. नियंत्रण कक्ष २४ तास सुरू राहणार आहे.

कर्जत नगर परिषदेने २०२२ च्या पावसाळ्यात संभाव्य नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने नियंत्रण कक्ष कार्यान्वित केला असून, तेथे नगर परिषदेच्या कर्मचाऱ्यांच्या २४ तास ड्युटी लावण्यात आल्या आहेत. नियंत्रण कक्षाचा नंबर ०२१४८-२२२०३३ व ०२१४८-२२११११ असा आहे. या नियंत्रण कक्षात एक रजिस्टर ठेवण्यात आले असून त्यामध्ये नियंत्रण कक्षात येणारे फोन व घटनांची नोंद करण्यात येत आहे. नगर परिषद क्षेत्रासाठी आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात आला असून या आराखड्यात शहरातील अधिकारी, लोकप्रतिनिधी, प्रतिष्ठित व्यक्ती, जलतरणपटू, सामाजिक संस्था, पत्रकार यांचे संपर्क नंबर संकलित करून ठेवले आहेत.

नगर परिषदेच्या अग्निशमन दलामध्ये लाईफ जॅकेट, दोरखंड, टॉवर लाईट, झाडे कटर मशीन आदी साहित्य अद्यावत करून ठेवण्यात आले असल्याची माहिती मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांनी दिली.

## बोर्ली नाका रस्ता पहिल्याच पावसात खड्ड्यात

### कोर्लई ते बोर्ली मुख्य रस्त्याची दुरवस्था

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्याच्या मध्यवर्ती असलेला बोर्ली नाका रस्ता पहिल्याच पावसात खड्ड्यात गेला आहे, तर कोर्लई ते बोर्ली रस्त्याची फारच दुरवस्था झाली आहे. रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ता अशा स्थितीत असलेला हा रस्ता स्थानिकांसह पर्यटकांनासुध्दा त्रासदायक ठरत आहे.

बोर्ली नाक्यावरील मुख्य रस्त्याला खड्ड्ेच खड्डे पडले असून पहिल्याच पावसाच्या दणक्याने रस्त्याची दयनिय अवस्था झाली आहे. खड्डेमय रस्त्यातून जाताना छोट्या-मोठ्या वाहनांना सर्कस करावी लागत आहे. या खड्ड्यात पाणी साचत असल्यामुळे त्यांची खोली समजत नाही, त्यामुळे वाहने या खड्ड्यात आपटत आहेत. अनेक दुचाकीस्वाराना या खड्ड्यांचा अंदाज न आल्याने किरकोळ व मोठ्या दुखापतीस सामोरे जावे लागत आहे.


(छाया : महेंद्र खैरे)

कोर्लईपासून बोर्लीपर्यत मुख्य रस्ताची अत्यंत बिकट परिस्थिती झाली आहे. या रस्त्याला खड्डेच खड्डे पडले आहेत, ते चुकविताना लहान-मोठ्या वाहन चालकांची पुरती तारांबळ उडते. हे खड्डे चुकविताना वळणावर समोरून वाहन आले, तर वाहनचालकांची कसरत होते.

सध्या पर्यटक मोठया संख्येने मुरूड पर्यटनासाठी येत आहेत, पर्यटकांची प्रवास कोर्लई ते बोर्ली या मार्गानेच होत आहे. रात्रीच्या वेळेस या मुख्य रस्त्यावर अंधाराचे साम्राज्य असते. पर्यटकांच्या वाहनासाठी मुरूडकडे जाणारा रस्ता अनौळखी असतो, शिवाय रस्त्याच्या दूरावस्थेमुळे वाहनचालक पुरता हैराण होतो.

या रस्त्याकडे सार्वजनिक बांधकाम खात्याचे दुर्लक्ष होत असल्याचे येथील स्थानिकांचे म्हणणे आहे. पर्यटक व स्थानिकांच्या सुविधेसाठी या रस्त्याची त्वरीत दुरुस्ती अथवा नुतनीकरण करण्यात यावे अशी मागणी केली जात आहे.

## म्हसळ्यातील आरोग्य कर्मचाऱ्यांचे उपोषण | तालुका आरोग्य अधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतर तात्पुरते स्थगित

**म्हसळा : प्रतिनिधी**

आपल्या पदाचा गैरवापर करून कार्यालयीन कामकाजात अनेक त्रुटी ठेवणाऱ्या लिपीक मयुर खांबे यांच्यावर कारवाई करावी, या मागणीसाठी म्हसळा तालुक्यातील आरोग्य कर्मचाऱ्यांनी गुरुवारी (दि. २३) खामगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात उपोषण केले. तालुका आरोग्य अधिकाऱ्यांच्या लेखी आश्वासनानंतर हे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले असल्याचे रायगड जिल्हा परिषद आरोग्य कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अमोल खैरनार यांनी सांगितले.

म्हसळा तालुक्यातील आरोग्य कर्मचाऱ्यांची वेतन देयके, वार्षिक वेतनवाढ वेळेवर मिळणे, ७ व्या वेतन वाढीतील फरक, कर्जवसुली आणि भरणा, पल्स पोलीओ लसीकरणाचा आशा, अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि आरोग्य कर्मचाऱ्याना भत्ता न मिळणे अशा कार्यालयीन कामकाजात लिपीक मयुर खांबे यांनी अनेक त्रुटी, अनियमीतता ठेल्या आहेत. त्या स्थानिक आणि जिल्हा प्रशासनाने सोडवून संबंधितावर कारवाई व्हावी, यासाठी खामगाव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आरोग्य सेविका स्नेहलता खैरे, स्त्रिपरिचर प्रेषिता सातनाक, आरोग्य सेवक कैलास घरत, आरोग्य सहाय्यीका संगिता सारंगे यांनी आणि तालुक्यातील आरोग्य कर्मचाऱ्यानी गुरुवारी दिवसाचे उपोषण केले होते. माजी कृषी सभापती बबन मनवे, खामगाव सरपंच प्रियांका निमरे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत गायकवाड, स्थानिक वैद्यकिय आधिकारी डॉ. गितांजली हंबीर, डॉ. दिपाली सरदार यांनी उपोषणकर्ते कर्मचाऱ्यांना सहानुभूती दिली



(छाया : संजय खांबेटे)

दरम्यान, लिपीक मयुर खांबे यांची जि.प.च्या सामान्य प्रशासन विभागामार्फत चौकशी सुरु आहे. वेतनातील आर्थिक त्रुटीबाबत गटविकास अधिकाऱ्यांमार्फत सुधारणा करण्यात येतील तसेच कार्यालयीन कामकाजातील त्रुटींची पूर्तता करण्याचे तालुका आरोग्य आधिकारी डॉ. प्रशांत गायकवाड यांनी लेखी पत्र दिल्यानंतर कर्मचाऱ्यांनी उपोषण मागे घेतले.

> **कनिष्ठ सहाय्यक मयुर खांबे यांनी केलेल्या गैरवर्तनाची शहानिशा करून त्यांच्यावर लवकरच कारवाई होणार आहे. रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील हे सर्व कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावणार आहेत.**
>
> **-अमोल खैरनार, रायगड जि. प. आरोग्य कर्मचारी संघटना**

## तंदुरुस्त राहण्यासाठी योगसाधना महत्त्वाची -डॉ. तात्याराव लहाने

**कर्जत : प्रतिनिधी**

योगामुळे शरीर तंदुरुस्त राहते. शिवाय आपली इच्छाशक्ती वाढवण्यासाठी योगा हा अतिशय मदतपूर्ण ठरतो. त्यामुळे सर्वांनी नियमित योगा केला पाहिजे, असे प्रतिपादन पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांनी व्यक्त केले.

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त रोगमुक्त भारत अभियाना अंतर्गत ज्योविस आयुर्वेद, इंटरनॅशनल नॅचरोपॅथी ऑर्गनायझेशन व सूर्या फाउंडेशन यांच्या संयुक्त वतीने ज्योविस आयुर्वेदच्या खुल्या सभागृहात प्राकृतिक चिकित्सा शिबिर आयोजित करण्यात आले होते. पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. योग साधना आणि पायी चालणे हे शरीर तंदुरुस्त ठेवण्यासाठी महत्वाचे आहे, असे त्यांनी या वेळी सांगितले.

रोगमुक्त भारत अभियाना अंतर्गत आयोजित केलेल्या या शिबिराच्या संयोजक वंदना दराडे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. डॉ. ज्योती सातपुते यांनी प्रास्ताविकात योग शिबिराचा उद्देश सांगून आयुर्वेदाचे महत्त्व सांगितले. डॉ. सद्गुरु मंगेशदा यांनी, सुखी, समृद्ध, रोगमुक्त भारत जर आपल्याला पाहायचा असेल तर आयुर्वेदाशिवाय पर्याय नाही, असे स्पष्ट केले. माजी उपमहापौर अरुण देव, डॉ. राज सातपुते यांनीही मनोगत व्यक्त केले. त्यानंतर योगाची प्रात्येक्षिके सादर करण्यात आली. पद्मा दीक्षित, शिवानंद महाराज यांच्यासह नागरिक या वेळी उपस्थित होते. नितीन धात्रक यांनी आभार मानले.


(छाया : विजय मांडे)

## गोड्या पाण्यातील माशांसाठी नेरळमध्ये खवय्यांची गर्दी


(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**

पावसाळा सुरु होताच नेरळ बाजारपेठेत गोड्या पाण्यातील माशांची आवक वाढली आहे. येथील अंबिका हॉटेल नाक्यावर रोज संध्याकाळी भरणाऱ्या बाजारात गोड्या पाण्यातील अनेक प्रकारचे मासे खरेदी करण्यासाठी झुंबड उडत आहे.

नेरळमधील अंबिका हॉटेल नाका आणि रेल्वे स्टेशन बाहेर मासे विक्रेते बसलेले असतात. उल्हास नदी आणि परिसरात असलेल्या धरणामधून मासे पकडून येथे विक्रीसाठी आणले जातात. नेरळ परिसरातील कातकरी आणि मल्हार कोळी लोक सकाळी जाळी लावून हे मासे पकडतात आणि दुपारी ते विक्रीसाठी नेरळ बाजारपेठेत आणतात. हे गोड्या पाण्यातील मासे खरेदीसाठी खवय्यांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे.



पावसाळ्यात जाळ्यात अडकणारे हे मासे चवदार असतात. त्यांची खरेदी करण्यासाठी कल्याणपासून पनवेलपर्यंतचे ग्राहक नेरळच्या बाजारपेठेत येत असतात.पावसाळा सुरू झाली की पोटामध्ये अंडी असलेले मासे खाण्याकडे खवय्यांच्या अधिक कल असतो. हे मासे काही ठराविक काळ सापडत असल्याने त्यांना पकडून आणण्यासाठी कातकरी समाजाचे लोक दिवस-रात्र एक करीत असतात. ठराविक काळात मिळणारे हे वल्गनीचे मासे जास्त चवदार लागत असल्याने त्यांच्या खरेदीसाठी ग्राहक गर्दी करतात.

नेरळच्या बाजारात सध्या खेकडे (मुठे), काळी चिंबोरी, मळ्याचे मासे, चिवण्या, करावले, मुरी, वाम, शिवडे अशा अनेक प्रकारचे गोड्या पाण्यातील मासे विक्रीसाठी येत आहेत. नेरळमधील अंबिका हॉटेलच्या बाजूला तसेच रेल्वे स्टेशनजवळ आदिवासी बांधव हे मासे विक्रीसाठी घेऊन येतात. ग्राहक कटकट न करता सांगतील तो भाव देऊन हे मासे खरेदी करतात.

> **आदिवासी बांधव गोड्या पाण्यातील मासे अंबिका हॉटेलच्या बाजूला विक्रीसाठी असतात. गोड्या पाण्यातील माशांची चव वेगळी असते. आम्ही सिझननुसार हे मासे खरेदी करायला आवर्जून येतो.**
>
> **-दिलीप कराळे, ग्राहक, नेरळ, ता. कर्जत**


**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**Re-E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.Tender fees Rs.500/- + GST

| Sr.No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000023368** **Tender No. : EE/EHV (O&M)/DN/PNL/Re-e-Tender-34/2022-2023.** Rfx Re-e-tender for work of Creation of New earth pit for Transformers at various substation and renovation of earth mesh at 22kV Yard at 220kV Apta Substation under EHV (O&M) Division Panvel. **Tender amount Rs. 16,45,925/-, EMD amount Rs. 16,459/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **27.06.2022, 17:00 Hrs. to 04.07.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 04.07.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **05.07.2022 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M. C. JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**E.H.V. (O&M) DIVN. PANVEL**

# भूमिपुत्रांचा पुन्हा एल्गार




























हे दैनिक मल्हार नेटवर्क प्रा. लि. च्या वतीने कृष्णा चांगु ठाकुर यांनी सिद्धकला प्रिंट मिडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., अॅट प्लॉट नं. डब्ल्यू-२३०, टी.टी. सी. इंडस्ट्रियल एरिया, खैरणे एम.आय.डी.सी., ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई -४००७१०, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र येथे मुद्रीत करून शॉप नं. ४, अॅस्पायर प्राईड, प्लॉट नं. २२७, निअर रुपाली सिनेमा, पनवेल, जिल्हा - रायगड, पिन - ४१०२०६, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✲ संपादक : देवदास लक्ष्मण मटाले ✲ E-mail : ramprahar@gmail.com ✲ RNI Regn. No. MAH MAR/2008/26534.

"Printed and Published by **Krishna Changu Thakur** on behalf of **Malhar Network Pvt. Ltd.** and Printed at **Siddhakala Print Media and Publications Pvt Ltd. Plot No. W 230, T. T. C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai - 400 710, Thane Dist, Maharashtra** and published from **Shop No. 04, Aspire Pride, Rupali Cowk, Panvel, Navi, Mumbai 410 206, Panvel, Raigarh- 410206, Maharashtra. RNI Regd. No. MAHMAR/2008/26534, Editor : Devdas Laxman Matale**